बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम.
प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | सोमवार,दि.११नोव्हेंबर २०२४ | वर्ष४रे | अंक९५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# ओबीसी प्रमाणं एससी,एसटी आरक्षण संकटात : आंबेडकर!



- काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेचे दोन्ही गटाच्या भूमिकेवर प्रश्न
- माजलगावमध्ये शेख मंजूरसाठी प्रकाश आंबेडकर यांची सभा
- सभागृहात तुमचे आमदार पाठवा, तरच आरक्षण टिकेल अन्यथा नाही

## मनोज जरांगेंच्या मागणीला विरोध ही भूमिका भाजपनं घ्यावी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी बीड जिल्ह्यातील माजलगाव विधानसभा मतदारसंघात प्रचारसभा घेतली. माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे वंचितचे उमेदवार शेख मंजुर चाँद साहब यांच्या प्रचारासाठी त्यांनी सभा घेतली. ओबीसी आरक्षण आणि मनोज जरांगेंची मागणी याबाबत प्रकाश आंबेडकर यांनी भाजपला आव्हान दिलं. याशिवाय एससी आणि एसटी आरक्षणातील वर्गीकरण आणि क्रिमिलेअरच्या मुद्यावर देखील प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनेचे दोन्ही गट यांच्या भूमिकेवर




### ओबीसी प्रमाणं एससी, एसटी आरक्षण संकटात

देशातील ओबीसी आरक्षण संकटात आहे त्या प्रमाणं एससी आणि एसटीचं आरक्षण देखील संकटात आहे. सुप्रीम कोर्टाच्या निकालात एससी आणि एसटी आरक्षणात क्रिमिलेअर टाकण्यात आलंय. यामुळं एका कुटुंबात एकानं व्यक्तीनं एकदा आरक्षणाचा लाभ घेतल्यास ते कुटुंब क्रिमिलेअरमध्ये येतं. क्रिमिलेअर मध्ये जो असेल त्याला आरक्षण लागू होणार नाही. हे तुम्हाला मंजूर आहे का असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी केला. काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी आणि दोन्ही शिवसेनेनं आरक्षणाबाबतच्या निर्णयाला पाठिंबा दिला, नवी समिती स्थापन केलीय, तुम्ही त्यांना मतदान दिलं तर ते काय करतील असा प्रश्न प्रकाश आंबेडकर यांनी विचारला.

**मनोज जरागेंच्या मागणीला विरोध हे भाजपनं सांगावं**

भाजपनं भूमिका घ्यावी की जरांगे पाटील यांच्या मागणीला विरोध आहे. भाजपनं ही भूमिका घ्यावी जरांगे पाटील यांची जी मागणी आहे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी आहे त्याला विरोध आहे हे जाहीरपणे म्हणावे. पण भाजप काय म्हणतंय, की जरांगे पाटील यांची जी मागणी आहे त्याला पाठिंबा आहे. तमचा पाठिंबा आहे तर आमचं वाटोळं का करुन घ्यायंचं, असा सवाल ओबीसी समाज करतोय, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं. ओबीसी समाज म्हणतोय आम्ही आमचं वाटोळ का करुन घ्यावं. दोन्ही आघाड्यांनी ओबीसी समाजाला प्रतिनिधी दिला नाही. हे लक्षात घ्या , विधानसभेत आमदार पाठवायचा असेल तर उमेदवार पाहिजे. उमेदवार नाही तर आमदार कसा जाणार, तिथं निर्णय घेतला तर ओबीसी आरक्षण कसं वाचवणार असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं.

## सिद्दीकी हत्या प्रकरणात मुख्य शूटर अटक

### प्रकरण: पोलिसांकडून शिवकुमार गौतमला अटक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या, या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. सिद्दीकी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेत तीन आरोपींचा समावेश होता. ज्या दिवशी बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता, त्याच दिवशी पोलिसांनी यातील दोन शूटरला अटक केली होती, मात्र ज्याने सिद्दीकी यांच्यावर गोळीबार केला होता, तो मुख्य शूटर शिवकुमार गौतम हा गर्दीचा फायदा घेऊन फरार झाला होता. अखेर त्याला



अटक करण्यात आला पोलिसांना यश आलं आहे. आरोपीकडून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची

## सत्तासंघर्षाचा निकाल लांबणीवर पडणे अतर्क्य

### मनु सिंघवी :सरन्यायाधीश यांची कारकीर्द उजवी

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताचे मावळते सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची कामगिरी ९० टक्के अतुलनीय व सर्वोत्तम असली तरी त्यांनी महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल आपल्या कार्यकाळात न देणे अतर्क्य असल्याची भावना ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ व काँग्रेस खासदार अभिषेक मनु सिंघवी यांनी व्यक्त केली.सरन्यायाधीश चंद्रचूड यांची कारकीर्द, महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावरील निकालाला लागलेला विलंब, विधानसभा अध्यक्षांकडून आदेशाचे पालन न होणे, काँग्रेस पक्षाची एकूणच भूमिका, मुस्लीम आरक्षणावर पक्षाची भूमिका अशा विविध विषयांवर



सिंघवी यांनी मनमोकळेपणे भाष्य केले.सरन्यायाधीश चंद्रचूड यांची विद्वत्ता, संयम, सहनशीलता, कामाचा ताण हाताळण्याची हातोटी हे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे आहेत, असे सांगत सिंघवी यांनी त्यांचे गुणगान केले. सरन्यायाधीश म्हणून ९० टक्के त्यांची कारकीर्द उजवी असली तरी काही प्रकरणांमध्ये निकाल न देण्याची त्यांची कार्यपद्धती अतर्क्य असल्याचे ते म्हणाले. राज्यातील सत्तासंघर्षात शिवसेना आणि राष्ट्रवादीतील फुटीवर आपणच सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली होती. निकाल लवकर द्यावा म्हणून अनेकदा सरन्यायाधीशांना विनंती केली. पण शेवटपर्यंत निकाल लागू शकला नाही. त्यांनी हे जाणीवपूर्वक केले नसावे, असे मतही सिंघवी यांनी व्यक्त

## पाकिस्तानात आत्मघातकी बॉम्बस्फोट

### देशविदेश: बलुचिस्तान प्रांतातील रेल्वे स्थानक हादरले



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील रेल्वे स्थानकावर शनिवारी झालेल्या आत्मघातकी बॉम्बस्फोटात १४ सुरक्षा कर्मचाऱ्यांसह किमान २७ लोक ठार आणि ६२ जण जखमी झाले. पेशावरसाठी निघालेली जाफर एक्स्प्रेस पकडण्यासाठी प्रवासी प्रांतीय राजधानी असलेल्या क्वेटाच्या रेल्वे स्थानकात जमले होते, त्या वेळीच हा बॉम्बस्फोट झाला.

हल्लेखोर आत्मघातकी हल्ला करण्याच्या उद्देशाने स्थानकात घुसले. त्यांना रोखणे कठीण होते, असे क्वेटा विभागाचे आयुक्त हमजा शफकत यांनी

**हल्लाबोल** | बाळासाहेब ठाकरेंचा उल्लेख करत म्हणाले

# नरेंद्र मोदींचं मविआ नेत्यांना आव्हान



नांदेड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुल गांधी कधी बाळासाहेब ठाकरे यांचं कौतुक करत नाहीत, त्यामुळे राहुल गांधींना बाळासाहेबांचं कौतुक करायला लावून दाखवावं, असं आव्हान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाविकास आघाडीतील नेत्यांना, शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवारांना दिलं आहे. तसेच ते म्हणाले, देश व महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेब ठाकरे यांचं योगदान अतुलनीय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नांदेडमधील प्रचारसभेत बोलत होते. यावेळी त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांचं कौतुक केलं. तसेच, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, या भारताच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात बाळासाहेब ठाकरे यांचं योगदान अतुलनीय आहे. परंतु, काँग्रेस नेत्यांच्या तोंडून त्यांच्याबद्दल कधी चांगले शब्द ऐकायला मिळत नाहीत. काँग्रेस नेते कधी बाळासाहेब ठाकरेंची प्रशंसा करताना दिसत नाहीत. त्यामुळे मी महाविकास आघाडीमधील नेत्यांना आणि काँग्रेसच्या दोस्तांना (उद्धव ठाकरे व शरद पवार) आव्हान देतो की त्यांनी काँग्रेसच्या युवराजांना (राहुल गांधी) बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचं कौतुक करायला लावावं. त्यांनी सार्वजनिकरित्या बाळासाहेब ठाकरे व त्यांच्या विचारांची प्रशंसा करावी. मी आजपासून दिवस मोजण्यास सुरुवात करत आहे. मी महाविकास आघाडीकडून उचित उत्तराची अपेक्षा व्यक्त करतो.

### अमित शाहांचं उद्धव ठाकरे यांना आव्हान

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीला आता अवघे दहा दिवस उरले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या प्रचाराला रंग चढला आहे. आरोप-प्रत्यारोप अन् टीका-टिप्पण्यांना उत आला आहे. अशातच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्र दौऱ्यावर असून भाजपाचा आज जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. जाहीरनामा प्रसिद्ध केल्यानंतर त्यांनी रावेर विधानसभा मतदारसंघात प्रचारसभेला संबोधित केलं. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंना थेट आव्हान दिलं आहे. अमित शाह म्हणाले, काँग्रेस, शरद पवार आणि उद्धव ठाकरे तिन्ही पक्ष एकत्र मिळून ही निवडणूक लढवत आहेत. हे राहुल बाबा आमच्या सावरकरांना विरोध करत आहेत. उद्धव ठाकरे तुमच्यात दम असेल तर राहुल गांधींना स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आणि बाळासाहेब ठाकरे यांच्याबाबत दोन चांगले शब्द बोलायला सांगा.

## भाजपकडून वचनांचा पाऊस

### पडघम:राज्याला तंत्रज्ञानाची राजधानी बनवणार




मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्राला जागतिक ‘फिनटेक’ व कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) राजधानी बनविण्याबरोबरच ५० लाख महिलांना लखपती दीदी, १० लाख नवीन उद्योजक, २५ लाख रोजगारनिर्मिती, १० लाख विद्यार्थ्यांना दरमहा १० हजार रुपये, अक्षय अन्न योजनेत कमी उत्पन्न गटातील कुटुंबांना मोफत शिधा आदी आश्वासने भाजपच्या ‘संकल्प पत्रा’त देण्यात आली आहेत.भाजपच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. महायुतीच्या दशसूत्री व्यतिरिक्त शेकडो आश्वासने भाजपने आपल्या जाहीरनाम्यात दिली आहेत. सोयाबीन, कापूस

पान २ वर...

## रेवड्यांची खैरात

सत्ता नसल्याने राजकीय पक्षांचे नेते कसे सैरभैर होतात हे महाआघाडीच्या मुंबईतील प्रचारसभेतून दिसून आले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना हे तीनही पक्ष उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये राज्यात अडीच वर्षे सत्तेवर होते. शरद पवारांच्या कल्पक योजनेतून महाविकास आघाडीचा जन्म झाला आणि ठाकरे यांच्या पक्षाला त्यांनी शिताफीने भाजपापासून दूर करून आपल्या कळपात घेतले. केवळ सत्तेसाठी एकत्र आलेली मोट फार काळ टिकली नाही. तीनही पक्षांचे आचार-विचार वेगळे. तिन्ही पक्षांत अनेक नेते महत्त्वाकांक्षी. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदाच्या मखरात बसवले पण त्यांना सत्ता राबवता येत नाही, ठाकरे यांना सरकार चालवता येत नाही, ठाकरे यांना आपल्या स्वत:च्या पक्षाचे आमदार संभाळता येत नाहीत याचेच दर्शन सर्व महाराष्ट्राला घडले. ठाकरे यांचे नेतृत्व कसे कुचकामी आहे याचाच अनुभव महाराष्ट्राला आला व त्याचा लाभ भाजपाला मिळाला.

काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सत्ता अनेक वर्षे उपभोगली आहे. ठाकरे यांनीही मुख्यमंत्रीपदाची ऐश अनुभवली आहे. त्यामुळे हे तीनही पक्ष सत्तेशिवाय राहू शकत नाहीत. एकदा सत्तेची चटक लागली की, वाटेल ते करून सत्तेच्या परिघात जाण्यासाठी तडफड सुरु होते, तसेच महाआघाडीच्या मुंबईतील बीकेसी मैदानावर झालेल्या प्रचारसभेत दिसून आले. महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्याच्या राजधानीत सभा घेतली की, त्याचे थेट प्रक्षेपण वृत्तवाहिन्यांवरून होते व घराघरांत प्रचार पोहोचतो. काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा राहुल गांधी, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे अध्यक्ष शरद पवार, उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षा गायकवाड अशा अनेक नेत्यांची फौज या सभेत मंचावर उपस्थित होती. महायुती सरकारचा पराभव करा व महाआघाडीला विजयी करा, हा एकच अजेंडा या सर्व नेत्यांकडे आहे. मोदी, शहा, शिंदे, फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली म्हणजे मते आपल्याकडे वळतील अशा स्वप्नरंजनात हे सर्व नेते आहेत. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत महायुतीला विशेषत: भाजपाला मोठा दणका बसला म्हणून विधानसभा निवडणुकीत महाआघाडीचे नेते डोक्याला बाशिंग बांधून फिरत आहेत.

तीन पक्षांची सभा व तीन पक्षांचे झेंडे या सभेत फडकताना दिसत होते. तीनही पक्षांचे कार्यकर्ते सभेला होते. त्यांना नेण्या-आणण्यासाठी शेकडो बसेसची व्यवस्था होती. पण अगोदरच्या तुलनेने महाआघाडीच्या सभेला गर्दी कमीच होती. जे लोक जमले होते, त्यांना पकडून आणले होते. सभेत कुठेही जोश नव्हता. टाळ्या घेणारा व गर्दी खेचणारा जबरदस्त वक्ता महाआघाडीकडे नाही, हे या सभेतून जाणवले. राहुल गांधींचे त्यातल्या त्यात आकर्षण. पण ते रोज तेच तेच बोलतात. संविधान बचावची हाळी देतात. खरे तर राहुल किंवा खरगे यांचे महाराष्ट्राला आकर्षण राहिलेले नाही. विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय मुद्दे चालत नाहीत, मग हे नेते बोलावून महाआघाडीला लाभ तरी काय होणार? खरगे सर्वात शेवटी बोलायला उठले. त्यांचे पद आणि त्यांचे वय बघून सभेत शिष्टाचार पाळला गेला हे उचित होते. पण ते माईकजवळ येताच लोक उठून निघाले. लोक मैदान सोडून जाऊ लागले, मला दहा मिनिटे द्या, अशी विनवणी खरगे यांना करावी लागली. पण लोकांना त्याबद्दल काहीच देणे-घेणे नव्हते. लोकांना काय पाहिजे, कोणाची भाषणे ते ऐकतात, हे जर महाआघाडीच्या नेत्यांना समजत नसेल, तर ते निवडणूक जिंकणार तरी कशी? सभेतील वक्ते भाजपाने ठाकरे सरकार पाडले म्हणून तुणतुणे वाजवत राहिले. त्यात त्यांनी नवीन काय सांगितले. आता अडीच वर्षांपूर्वीची सहानुभूती राहिली आहे का? भाजपाला संविधान कमकुवत करायचे आहे, असे सांगताना राहुल गांधी हातात लाल रंगाचे नोट पॅड उंचावून तावातावाने बोलताना दिसत होते. संविधान लाल रंगाचे कधी झाले? राहुल यांनी महाआघाडीची पंचसूत्री जाहीर करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. महाआघाडी सत्तेवर आल्यावर आमचे सरकार महिलांना दरमहा ३००० रुपये देणार, राज्यात महिलांना बस प्रवास मोफत देणार, पंचवीस लाखांपर्यंत आरोग्य विमा व मोफत औषधे, जातिनिहाय जनगणना, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवणार, ३ लाखांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्याना ५० हजार प्रोत्साहन, बेरोजगार तरुणांना दरमहा ४ हजार रुपये इत्यादी महायुती सरकारच्या घोषणांची कॉपी करण्याचा प्रयत्न महाआघाडीने चालवला आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून सध्या दोन कोटींपेक्षा जास्त महिलांना दरमहा पंधराशे रुपये मिळू लागले आहेत. नोव्हेंबरचा हप्ता ऑक्टोबरमध्येच देण्याची किमया शिंदे सरकारने करून दाखवली. पुन्हा सत्ता मिळाल्यावर तीन हजार रुपये लाडक्या बहिणींना देऊ असे मुख्यमंत्री सांगत आहेत. म्हणून महाआघाडीने ४ हजार रुपयांचे आमिष युवकांना दाखवले आहे.

# एवढी 'पडझड'का होतेय?

सर्वांत वेगवान, सर्वांत लांबलचक, सर्वांत उंच, सर्वांत भव्य सारं कसं चकाचक दिसलं पाहिजे. नद्या कितीही प्रदूषित असू देत रिव्हरफ्रन्ट मात्र लख्ख हवा, नव्या कोऱ्या उड्डाणपुलांवर खड्डे पडले तरी चालतील, पण त्यांची ग्राफिटीने वारंवार रंगरंगोटी मात्र झालीच पाहिजे. एखादी जागतिक परिषद होतेय, गरिबी- अस्वच्छता पडदे लावून झाकून ठेवा, परदेशी पाहुण्यांना सारं काही आंतरराष्ट्रीय दर्जाचं दिसलं पाहिजे. भविष्याचा विचार सोडा. वर्तमानात जगा. उद्घाटनापुरतं तरी सारं काही भव्यदिव्य असलं पाहिजे. फोटो व्हिडीओमध्ये सुंदरच दिसलं पाहिजे. घर ते बाजार, शाळा, ऑफिस या रोजच्या ५-१० किलोमीटरमध्ये कितीही खड्डे, गर्दी, विलंब चालेल, प्राधान्य मात्र बुलेट ट्रेनला हवं देशातल्या पायाभूत सुविधांबाबत असाच काहीसा दृष्टिकोन दिसू लागला आहे.पंतप्रधानांच्याच हस्ते २२ जानेवारी २०२४ रोजी अयोद्धेतल्या बहुप्रतीक्षित राममंदिरात श्री रामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. भव्य सोहळा झाला. आणि अवघ्या सहा महिन्यांत जून २०२४मध्ये गाभाऱ्यालगतच्या मंडपाला गळती लागली. नूतनिकरण झालेल्या अयोध्या रेल्वे स्थानकाचा परिसर जलमय झाला. राम पथावर खड्डे पडले, पाणी साचलं. पाण्याचा तातडीने उपसा करण्यात आला, मात्र भाविकांना चिखलातून जावं लागलं. मंदिराची संगमरवरी फरशी



कळकट तर झालीच शिवाय त्यावरून पाय घसरू लागले. संबंधित यंत्रणांनी मंदिराचं बांधकाम अद्याप पूर्ण झालेलं नाही, वरचे भाग खुलेच असल्यामुळे पाणी वाहून खाली आलं, असं स्पष्टीकरण दिलं. पण बांधकाम अर्धवट असताना प्राणप्रतिष्ठा करण्याची घाई का केली हा त्यावेळी शंकराचार्यांनी उपस्थित केलेला प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाला.४ डिसेंबर २०२३ सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या राजगड किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते शिवरायांच्या ३५ फुटी पुतळ्याचं अनावरण झालं आणि अवघ्या नऊ महिन्यांत २८ ऑगस्ट २०२४ रोजी पुतळा कोसळला. महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली.पंतप्रधानांनी १२ जानेवारी २०२४ रोजी मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या, तब्बल १८ कोटी रुपये खर्च करून उभारलेल्या अटल सेतूचं उद्घाटन केलं. लगोलग छायाचित्रं, चित्रफिती व्हायरल झाल्या. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लांबलचक पुलावरून विहंगम दृश्य पाहत प्रवास करण्यासाठी मुंबई, नवी मुंबईकरांची रिघ लागली आणि पाचच महिन्यांत २१ जून २०२४ रोजी बातमी आली- अटल सेतूला तडे गेले. जबलपूर एअरपोर्टच्या नव्या टर्मिनलचं छत २८ जून २०२४ रोजी कोसळलं. हे छत म्हणजे विमानतळाचं सौंदर्य वाढवण्याच्या दृष्टीने उभारलेली कापडी कानॉपी होती. पावसाचं पाणी त्यावर साठलं आणि ती फाटून खालून जाणाऱ्या वाहनावर कोसळली. गाडीच्या छताचा आणि काचांचा अक्षरशः चक्काचूर झाला. या टर्मिनलचं आवघ्या तीनच महिन्यांपूर्वी १० मार्च २०२४ रोजी उद्घाटन झालं होतं- पंतप्रधानांच्याच हस्ते.विश्र्वगुरू, महशक्तीचा कितीही जप केला तरी प्रत्यक्षात अद्यापही विकसनशील असलेल्या आपल्या देशाला काय हवं आहे? रोजचं जीवन सुसह्य, सुरक्षित करणाऱ्या, टिकाऊ पायाभूत सुविधा. जिथे एका तासात पोहोचता येतं तिथे पोहोचण्यासाठी तीन तास लागणार नाहीत याची शाश्वती. घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी हतीपायी धड परत येईल अशी खात्री. कोणी होर्डिंग कोसळून दगवणार नाही, मॅनहोलमधून वाहून जाणार नाही ही निश्चिंतता अमुक शे किलोमीटरचे बहुपदरी महामार्ग, निसर्गावर मात करणारे भुयारी मार्ग, सर्वांत उंच, सर्वांत जास्त, सर्वांत भव्य, सर्वांत वेगवान, सर्वात कमी कालावधीत असेल विश्वविक्रम आपल्याला परवडणार आहेत का? त्यांची खरंच गरज आहे का?

## विवाह सोहळा उत्साहात सपन्न



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

गुलाम मुजीब शेख यांची कन्या इकरा फातेमा यांचा विवाह अबू तलाहा यांच्याशी आज ११:३० वा दि ९ नोव्हेंबर रोजी लातूर येथील सुप्रिया मस्जित जवळील एस एस काजी हॉल येथे संपन्न झाला.

याप्रसंगी शुभेच्छा देत असताना आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी गजेंद्र केंद्रे , परभणी जिल्ह्याचे पशुवैद्यकीय अधिकारी नामदेव आघाव, परळीतील व्यापारी केदार शेठ सारडा, आंबेजोगाईचे सचिन कर्नावट, जगजीवन लवराळे, संतोष जोगदंड पाटील, छ संभाजीनगरचे अथर बेग, संतोष नायर, डॉ आनंद सराईकर, कंत्राटदार भगवान साकसमुद्रे, भास्कर सोनवणे सह वर्गमित्र यावेळी उपस्थित होते.

## अन् रेल्वे कर्मचारी चिरडला;बिहारमध्ये भीषण अपघात!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बिहारमधील बेगुसराय जिल्ह्यातील बरौनी जंक्शन येथे भीषण अपघात घडला आहे. येथे रेल्वेच्या इंजिन आणि बोगीमध्ये अडकून एका रेल्वे कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतरचा एक व्हिडिओही समोर आला. यामध्ये एक रेल्वे कर्मचारी इंजिन आणि बोगीमध्ये अडकलेला दिसतोय. रविवारी (१० नोव्हेंबर) सकाळी ८ वाजता हा अपघात घडला.ही संपूर्ण घटना बरौनी जंक्शनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक पाचवर घडली. लखनौ-बरौनी एक्स्प्रेस ट्रेनच्या इंजिन आणि बोगीच्या मध्ये चिरडून तरुणाचा मृत्यू झाला. अमर कुमार (४०, रा. बरौनी कॉलनी) असे मृत रेल्वे कामगाराचे नाव आहे. वडिलांच्या निधनानंतर अमरला ही



नोकरी मिळाली होती. अमरच्या वडिलांचे पाच वर्षांपूर्वी निधन झाले. त्यानंतरच अमरला अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळाली.अमरच्या कुटुंबीयांना घटनेची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी पोहोचले. मुलाच्या मृत्यूनंतर पायलट घटनास्थळावरून पळून गेल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. अपघाताबाबत सांगितले जात आहे की, रविवारी सकाळी ट्रेन बरौनी जंक्शनवर आली होती. दरम्यान, अमर हा रेल्वे इंजिन आणि बोगीमधील कपलिंग उघडण्यासाठी गेला होता. त्यानंतर लोको पायलटच्या निष्काळजीपणामुळे अमर मध्येच चिरडला गेला आणि त्यानंतर त्याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर लोको पायलटने घटनास्थळावरून पळ काढला, अशी माहिती इंडिया टुडेने दिली आहे.त्याचवेळी रेल्वेने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. रेल्वे अधिकाऱ्याचे म्हणणे आहे की, अमर कुमारला वर्षभरापूर्वी नोकरी मिळाली होती आणि त्याचे १२ डिसेंबरला लग्न होणार होते.

पान एक वरून

**ओबीसी प्रमाणं एससीफ**

प्रश्न उपस्थित केले. ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी विधानसभेत ओबीसी समाजाचे आमदार हवेत, असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं. वंचित बहुजन आघाडीनं आरक्षण यात्रा ज्यावेळी काढली तेव्हा किमान ओबीसीचे १०० आमदार विधानसभेत पाठवणार आहोत, असं सांगितलं होतं. त्यामाध्यमातून ओबीसी आरक्षण वाचवणार, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. यावेळी जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, शैलेश कांबळे ,विष्णू जाधव महासचिव मिलिंद घाडगे,खंडू जाधव, जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर, अंकुश जाधव, भारत तांगडे , माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, सचिन उजगरे,धम्मानंद साळवे, समाधान गायकवाड, शत्रुघ्न कसबे, सुदेश पोतदार, भीमराव अवसरमल यांची उपस्थिती होती.

**सिद्दीकी हत्या प्रकरणात**

शक्यता व्यक्त केली जात आहे. बाबा सिद्दीकी हत्याप्रकरणात पोलिसांना मोठं यश आलं आहे. या प्रकरणातील मुख्य शूटर शिवकुमार गौतमला अटक करण्यात आली आहे. त्याला उत्तर प्रदेशच्या बहाराईच येथून अटक करण्यात आली आहे. शिवकुमार गौतम सोबत आणखी २ इतर आरोपींना देखील पोलिसांनी अटक केलं आहे. मुंबई पोलीस गुन्हे शाखा आणि उत्तर प्रदेश एस टी एफ ने ही संयुक्त कारवाई केली आहे. उत्तर प्रदेश एस टी एफच्या पथकासोबत मुंबई पोलीस गुन्हे शाखेचे सहा अधिकारी आणि इतर पंधरा जण या संयुक्त कारवाईत सहभागी झाले होते. दरम्यान अटक करण्यात आलेल्या आरोपींना आता मुंबईला आणलं जात आहे. पोलीस तपासात आरोपींकडून अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे.काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दीक यांच्यावर गोळीबार करण्यात आला. ज्या दिवशी गोळीबार करण्यात आला तो दसऱ्याचा दिवस होता. सिद्दीकी हे आपल्या मुलाला भेटण्यासाठी कार्यालयात आले होते. याचदरम्यान तिघांनी बाबा सिद्दकी यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या हत्याप्रकरणी लॉरेन्स बिश्नोई गँगच कनेक्शन देखील समोर आलं आहे.

**सत्तासंघर्षाचा निकाल लांबणीवर**

केले. महाराष्ट्र विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबरला संपुष्टात येत आहे. यामुळे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या राज्यातील सत्तासंघर्षाच्या याचिकांचे भवितव्य काय, या प्रश्नावर या याचिका निष्फळ किंवा निष्प्रभ होणार नाहीत, असे सिंघवी म्हणाले. कदाचित सरकारच्या वतीने या याचिका निकालात निघाव्यात म्हणून भूमिका मांडली जाऊ शकते. पण आम्ही त्याला विरोध करू, असेही त्यांनी सांगितले. राज्यघटनेच्या दहाव्या परिशिष्टाचा अन्वयार्थ, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची कृती, राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष व केंद्रीय निवडणूक आयोगाचे निर्णय आदी मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा भविष्यकाळातील राजकीय घटनांसाठी पथदर्शी ठरेल, अशी भूमिकाही त्यांनी मांडली.

**विधानसभा अध्यक्षांकडून निकालास विलंब :** राज्यघटनेतील दहाव्या परिशिष्टातील तरतुदीनुसार पक्षांतर केलेल्या आमदारांबाबत कारवाई करण्याचे अधिकार विधानसभा अध्यक्षांना आहेत. पण त्यांनी निर्णय किती दिवसांत द्यावा, याची निश्चित कालमर्यादा नाही. त्यामुळे अध्यक्ष ज्या राजकीय पक्षातून आला असेल, त्यांच्याबरोबर असलेल्या पक्षाच्या आमदारांबाबत आणि विरोधी पक्षातील आमदारांबाबत वेगवेगळी भूमिका घेतली जाते. त्यामुळे राजकीय सोयीनुसार अध्यक्षांकडून निकाल दिला जातो. काही प्रकरणांत चार-आठ दिवसांत निर्णय होतो, तर काही प्रकरणांमध्ये अनेक महिने व वर्षेही लागतात. सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील प्रकरणामध्ये विधानसभा अध्यक्षांना किमान तीन वेळा निर्देश देऊनही आमदार अपात्रता याचिकांवर तातडीने निर्णय घेण्यास विलंब लावला याकडे सिंघवी यांनी लक्ष वेधले.

**पाकिस्तानात आत्मघातकी**

सांगितले. दरम्यान, मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असल्याची माहिती या वेळी पोलीस अधीक्षक (मोहीम) मुहम्मद बलोच यांनी दिली आहे. परिसराची सुरक्षा वाढवली असून जखमी आणि मृतांना सरकारी रुग्णालयात दाखल केल्याचे प्रांतीय सरकारचे प्रवक्ते शाहीद रिंद यांनी सांगितले.बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या बलूच फुटीरतावादी गटाला दहशतवादी संघटना म्हणून घोषित करण्यात आले आहे. या संघटनेने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. पाकिस्तान सरकार बलुचिस्तानच्या संसाधनांचा वापर करून या भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप बीएलएने केला आहे.

**भाजपकडून वचनांचा**

व अन्य उत्पादनांना किमान आधारभूत किमतीनुसार भाव मिळावा आणि त्यापेक्षा कमी दर बाजारपेठेत मिळाल्यास फरकाची रक्कम सरकार शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन भाजपने दिले आहे. महाराष्ट्र २०२७ पर्यंत डाळ उत्पादनात आत्मनिर्भर करण्यासाठी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येतील. शेती उत्पादने निर्यातक्षम करण्यासाठी पॅकिंग हाऊसची उभाणी करून साठवण क्षमता व प्रक्रिया सुविधा तयार केल्या जातील. शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांवरील एसजीएसटी अनुदान स्वरूपात परत करण्यात येईल, अशी अनेक आश्वासने भाजपच्या जाहीरनाम्यात येण्यात आली आहेत.

पान सहा वरून

**बीडमध्ये एमआयएम पक्षाला**

बाळासाहेबच करु शकतात. याची खात्री पटल्याने आम्ही प्रवेश करीत असल्याचे सांगितले.पाशा यांच्यासह अहमद पठाण,रफिक शेख,अकबर सय्यद,आदिल शेख,फारुक मोमीन,उमर खान,अजमल शेख,जमीर शेख यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी जाहिर प्रवेश करुन पक्षाचे उमेदवार पुरुषोत्तम वीर यांच्या विजयासाठी व पक्ष वाढीसाठी ताकदीने काम करण्याचे आश्वासन दिले.

**मौलाना अबुल कलाम आझाद**

स्वतंत्रतेसाठी इंग्रजांसोबत संघर्ष करणारे, देशासाठी, देश बांधव आणि भगिनींसाठी अनेक वेळा तुरुंगवास भोगलेले मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाचे कार्य यानिमित्ताने नवीन पिढी समोर अधोरेखित व्हावे. ज्यामुळे अशा महान विभूतींचे, त्यांच्या इतिहासाचे विसर पडता कामा नये म्हणून मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती सर्व शासकीय-प्रशासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी. तसेच मौलाना आझाद युवा मंच सुद्धा त्यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करणार असल्याचे मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हाध्यक्ष अरफात खान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

**सिंदफणा शाळेचा वार्षिक**

जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, अर्चना जाधव यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. शाळेचे क्रीडांगण विविध वयोगटातील स्पर्धकांच्या रंगतदार स्पर्धांनी गजबजून गेले होते. सर्व खेळाडू आपले कौशल्य पणाला लावून खेळत होते. पालकांनी खेळाडूंचे कौतुक केले. या प्रसंगी शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम, विशेष अतिथी म्हणून गुरुकुल इंग्लिश स्कूलचे प्राचार्य शितल सर्वज्ञ आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये या क्रीडा महोत्सवाबद्दल मोठा उत्साह दिसून आला आणि विविध स्पर्धांमधून त्यांचे कौशल्य पाहायला मिळाले.

**श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक**

दिंड्या या ठिकाणी येतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य ठिकाणी आहे. त्यामुळं येणारा प्रत्येक भाविक या ठिकाणी आल्यावर समाधान व्यक्त करतो. आणि सर्व समाज एकत्र करून एक विचार या ठिकाणावरून घेऊन जातात.या सर्व कार्यक्रमाचा लाभ भाविकभक्तांनी घ्यावा असे आवाहन देवस्थान पंचकमेटी, श्रीक्षेत्र कपिलधार येथील पुजारी विश्वनाथ बापू स्वामी, डॉ. त्रिंबक नागनाथ स्वामी कपिलधार, वैजिनाथ महाराज शिंदे दत्तसंस्थान बालाघाट यांनी केले आहे.

**हाफ मॅराथॉन स्पर्धेत सुवर्ण**

मा. आ. व्यंकटराव कदम साहेब, सचिव, योगेश भैय्या कदम, संस्थेचे सर्व संचालक, प्राचार्य डॉ के के पाटिल, क्रीडा संचालक, डॉ ए डी टेकाळे, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, डॉ विठ्ठल भोसले आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शूभेच्छा दिल्या.

**साहित्य परिषदेच्या निवडणुकीत**

क्षेत्रात महत्त्वपूर्ण मानले जाते. साधारणत: दीड डझन ग्रंथांचे लेखन-संपादन त्यांनी केले असून बीड शहर आणि परिसरात सातत्याने साहित्यिक -सांस्कृतिक उपक्रम त्या राबवत आलेल्या आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा बीड आणि अखिल भारतीय मराठी बालरंगभूमी शाखा बीड यासंदर्भात त्यांनी केलेले कार्य अत्यंत भरीव स्वरूपाचे आहे. त्यांच्या या विजयामुळे बीड परिसरातील साहित्यिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या काळात बीड परिसरातील साहित्यिक चळवळ अधिक जोमाने पुढे जाईल असा विश्वास नागरिकातून व्यक्त केला जात आहे.

**महिलांचे हित जोपासले** ... जनतेसाठी अहोरात्र कष्ट करत मतदार संघाचा सर्वांगीण विकास केला आहे. भविष्यातील या मतदारसंघातील अडीअडचणीसह महाविकासाची धुरा सांभाळण्यासाठी आमदार प्रकाश दादा सोळंके यांना परत निवडून देण्याचे आवाहन ऐश्वर्या सोळंके यांनी केले. गेल्या तीन वर्षात ऐश्वर्या सोळंके यांनी या भागातील जनतेसाठी आरोग्य सेवेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले असल्याने जनतेचा कल आमदार सोळंके यांच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे. जैतापूरच्या सरपंच छाया भागवत दराडे यांच्यासह परिसरातील बहुसंख्य महिला या बैठकीच्या वेळी उपस्थित होत्या.

**बीड क्षीरसागरांपासून**

गावागावातून मतदारांनी व्यक्त केली. दरम्यान माजी राज्यमंत्री प्रा सुरेश नवले आणि अनिलदादा यांनी कॉर्नर बैठकीत मगरूर क्षीरसागरांपासून बीडवासियांची सुटका करून बीडचा विकास करायचा आहे आणि सामान्यांचे मूलभूत प्रश्न सोडवायचा आम्ही निर्धार केला असून आम्हाला मतदानरुपी आशीर्वाद द्या असे आवाहन केले. याप्रसंगी अनिलदादा जगताप आणि प्रा नवले यांच्याबरोबर सहकारी कार्यकर्ते समर्थक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता तर गावागावात कॉर्नर बैठकीसाठी मतदारांची देखील भरीव उपस्थिती होती.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अ‍ॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# उंची आभाळाएवढी



डॉ. स्नेहलता देशमुख



स्नेहधारा

पूनम राणे

संवाद ही माणसाची भूक आहे. आणि उत्तम संवाद कौशल्य असणे, ही मानवाला मिळालेली अनमोल देणगी आहे.

निसर्गात पाहिले तर, सर्वांचा संवाद चाललेला असतो. पक्षी आपल्या किलबिलाटातून, निर्झर आपल्या खळखळाटातून, वसंत ऋतू धारेतून, शिशिर ऋतू गुलाबी थंडीतून. परंतु मानवाच्या बाबतीत हा संवाद सुसंवाद जेव्हा होतो, तेव्हा अनोखं व्यक्तिमत्व उदयाला येतं. आणि अशाच काही व्यक्तिमत्त्वांची ओळख स्नेहधारा या सदरातून मी आपल्यापर्यंत पोहोचवणार आहे.

विद्यार्थी मित्रांनो, यातून आपल्याला प्रेरणा मिळेल आणि आपल्याला आपल्या बलस्थानची ओळख होऊन आपल्या व्यक्तिमत्व विकास नक्कीच घडेल.

मानवाला परमेश्वराने रंग, रूप, उंची दिली हे आपल्याला बदलता येत नाही. परंतु सुसंस्काराने आपल्याला आपले व्यक्तिमत्व मात्र निश्चित बदलता येते.

आजची कथा आहे, उंचीने छोट्या असणाऱ्या एका मुलीची. बरं का मित्रांनो, शाळेत आपल्याला उंचीप्रमाणे बसवतात. उंची छोटी असल्याने प्रत्येक वेळेला अगदी दहावीपर्यंत पहिल्या बाकावर बसावे लागते आणि नेहमी बाईंच्या नजरेत राहावे लागते. त्यामुळे वर्गातील काही मुले उंचीने लहान असलेल्या मुलांना बुटकी, बुटुक बैंगन म्हणून चिडवतात.

असेच एकदा या मुलीला वर्गातील मुलींनी चिडवले. ती घरी आली. दुखीकष्टी झाली आणि एक दिवस आईला म्हणाली, ''आई, का, गं, अशी मी बुटकी!" देवाने मला उंची का दिली नाही? सांग ना गं आई. असे म्हणून ती रडायला लागली. आई तात्काळ म्हणाली , "वेडी गं वेडी'' ''अगं, तुला कोणी सांगितले की, उंची शरीराने मोजतात. अगं उंची बुद्धीची मोजतात, डोक्याची मोजतात."

तू वाईट वाटून घेऊ नकोस . ''मला अभिमान आहे माझ्या लेकीच्या बुद्धीचा." अगं तुझ्या डोक्याची उंची भली मोठी आहे याची जाणीव आहे का तुला. आई म्हणाली. आणि लक्षात ठेव, "तुझ्या हातून एवढे मोठे काम होईल की, तुझ्यापेक्षा उंच असणाऱ्या माणसाला तुझ्या गळ्यात हार घालताना वाकावं लागेल."

असाच एक प्रसंग रक्षाबंधनाच्या दिवशी घडला. आई, "मी कुणाला राखी बांधणार? मला भाऊ का नाही." आईने मात्र विचारपूर्वक उत्तर दिले ती म्हणाली, ''भाऊ नाही काय म्हणतेस," अगं, "आपल्यासमोर जे हनुमंताचे मंदिर आहे ना, तोच तुझा भाऊ!" शक्तिमान, बुद्धिमान, सामर्थ्यवान! चल, त्यालाच राखी बांध."

तिला खूप आनंद झाला, दरवर्षी ती हनुमंताला राखी बांधू लागली.

आईच्या चपलक संवादातून मुलगी घडत होती. संस्कारित होत होती.व्यक्तिमत्व घडत होते. आईच्या डोक्यात आपल्या लेकीविषयी ठासून भरलेला अभिमान ऐकून मुलीच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. यानंतर ती कधी रागवलीच नाही. परमेश्वराला दूषण लावली नाहीत. ती अभ्यासात चमकत राहिली. प्रथम क्रमांक तिने सोडलाच नाही. मोठी पेडिॲट्रिक सर्जन झाली. सायन हॉस्पिटलची डीन झाली.

आणि त्यानंतर मुंबई विद्यापीठाची कुलगुरू ! बरं का मुलांनो, आज जे तुमच्या नावासोबत बाबांबरोबर तुमच्या आईचे नाव लावावे हा ठोस निर्णय ज्यांनी घेतला त्या डॉ. स्नेहलता देशमुख, मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू. आईचे शब्द तंतोतंत खरे ठरले.

त्यांचे बिंब- प्रतिबिंब, शब्द फुले, स्नेहमयी, पेडियाट्रिक सर्जरी, अरे संस्कार संस्कार, तंत्र युगातील उमलती मने, गर्भसंस्कार तंत्र आणि मंत्र, या विषयावर पुस्तके व कॅसेटही प्रकाशित झाले आहेत.

तसेच पॅरालॉजिक फाउंडेशन या संस्थेच्या उपाध्यक्ष, मुंबई मेडिकल फाउंडेशन या संस्थेच्या उपाध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद, हरगोविंद मेडिकल फाऊंडेशनच्या उपाध्यक्ष तसेच मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू अशी अनेक पदे त्यांनी भूषविली आहेत.

तात्पर्य : आईच्या उत्तम संवाद कौशल्यातून या प्रकारची महान व्यक्तिमत्व घडत असतात आणि आपल्या कर्तृत्वातून आभाळाएवढी उंची गाठून अजरामर होतात.

# नथ नाकात साजिरवानी...





हलकं-फुलकं

राजश्री वटे

चेहऱ्याचे सौंदर्य वाढवते नाकावरचे एक स्वल्पविराम म्हणजेच खानदानी दागिना... "नथ''!

नथीच्या दिसण्यातच एक ठसका आहे... बारा ते पंधरा पांढऱ्या मोत्यांच्या मध्ये रुबाबदार माणिक व चमकदार हिरवा पाचू... लक्ष्मीच्या पावलासारखा तिचा आकार!

देवीच्या मुखवट्यावरचे दैदीप्यमान तेज या नथीमध्ये सामावून जाते!

ऐतिहासिक घराण्यापासून नथीचा प्रवास सुरू होतो!!

शिवकालीन जिजाईचा अभिमान आहे ही नथ... राणी लक्ष्मीबाईचे मर्दानी सौंदर्य या नथीने तेजाळते...

पेशवाई घरंदाज स्त्रीच्या करारी चेहऱ्यावरचा दरारा वाढवते ती ऐटबाज नथ, भारदस्तपणाचे कोंदण तिला असतं!

मराठमोळ्या सौंदर्याचा, डोक्यावरच्या पदरा आडून डोकावणाऱ्या नथीचा खानदानी श्रीमंती थाट काही औरच!!

दागिन्यांमध्ये नथीला मानाचे स्थान...

नव्या नवरीचे नटणे, थटणे, सजणे... नथ घातल्यावरच साजशृंगार पूर्ण होतो... नवरीचे सोज्वळ, शालिन सौंदर्य खुलत जाते!!

चंद्रकोर भाळी
नाकी नथ साजिरी,
साज शोभे गळ्यावरी
लेवूनी शेला भरजरी!

नवरीचे हसू नथी आडून लाजते... अन तिच्या अधरांना लडीवाळ स्पर्श नथीचा!


भारूड, जोगवा, कोळीगीत, यळकोट यात नथीचे मिरवणे असतेच...

पण लावणी मधल्या नथीत एक मादक ठसकेबाजपणा जाणवतो!

एक हौस पुरवा महाराज... मला आणा कोल्हापुरी साज! नथीला साज हवाच... ही जोडी अधिकच उठावदार दिसते हे तितकेच खरे!!

रेशमाच्या रेघांनी लाल काळ्या धाग्यांनी...
पदरावरती जरतारीची नथ साजिरी हवी!
महाराष्ट्राची शान "नथ''...
साडी चोळीवर मिरवायला लागली! पुरे आता " नथीचा नखरा''!
बाकीचे दागिने रुसायचे...
नाकापेक्षा मोती जड व्हायचे!!!

# 'सांग तू आहेस का?'





नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे

पूर्वी आकाशवाणीवर पहाटेच्या मंगल प्रहरात भक्तिगीते लावली जात. अवघा महाराष्ट्र सकाळची कामे करता करता ती गाणी ऐकत असे. त्याकाळी सर्वांच्या दिवसाची सुरुवातच प्रसन्न, सकारात्मक विचाराने करून देण्याचे काम आकाशवाणी मनोभावे करत होती. त्याशिवाय संगीताच्या, गाण्याच्या वेगवेगळ्या कार्यक्रमातही भावगीते लावली जात. ती आवडीने ऐकणारा एक मोठा श्रोतृवर्ग होता. अशाच भावगीतातील काही गाणी ही भक्तीगीत म्हणूनही जन्माला आली होती. ती श्रोत्यांना सकाळच्या मंगलप्रहरी चिंतनशील करून टाकत असत. तशीही जी मने केवळ शारीरिक पातळीवरच जगत नसतात, ज्यांना खाणे-पिणे, रंगीबेरंगी पोशाख परिधान करणे, सृष्टीसौंदर्य पाहणे, आणि शरीरसुखाचा अनुभव घेणे यापलीकडेही काही करण्यासारखे आहे असे वाटत असते ती वयाच्या कोणत्या तरी टप्प्यावर चिंतनशील होतातच.

त्यांना हे जग काय आहे? मी कोण आहे? मी या जगात कशाला आलो? आणि अनिच्छेनेच का होईना पण मला इथून एक दिवस कुठे जावे लागणार आहे? असे प्रश्न पडू लागतात. पुढे पुढे या सर्व प्रश्नांच्यापेक्षा एक प्रश्न अधिकच महत्त्वाचा वाटू लागतो. तो म्हणजे हे जग कुणी आणि कशाला निर्माण केले? शिवाय खरेच असा कुणी निर्माता आहे का?

माणसाला विचार करण्याची क्षमता आल्यापासून, म्हणजे खरे तर हजारो वर्षांपासून, हे प्रश्न माणसाला पडत आले आहेत. त्याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. त्यातूनच तर सगळे अध्यात्म सुरू झाले. त्याचा उपयोग काही माणसांनी आपापले क्षुद्र आर्थिक हितसंबंध, अनावर अमर्याद राजकीय महत्वाकांक्षा साधण्यासाठी एखाद्या धर्माच्या नावाने सुरू केला, तर भारतीय ऋषीमुनी, भगवान बुद्ध, महावीर यांच्यासारख्या विरक्त मुमुक्षूंनी खरोखर सत्य शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

भारतीय अध्यात्मात सर्वात महत्त्वाचा मानला जाणारा प्रश्न आहे 'कोहम?' म्हणजे मी कोण आहे? माणसाने हा प्रश्न आधी स्वतःला विचारला होता. आणि मग त्याला ज्याने हे विश्व निर्माण केले असावे, असे वाटते 'त्यालाही' विचारला. या प्रश्नाचाच पुढचा भाग आपोआपच मनात येतो. तो म्हणजे 'कोत्वं?' म्हणजे हा सर्व जगडव्याळ पसारा निर्माण करणारा तू कोण आहेस? अनेक संवेदनशील, सकारात्मक साधकांनी आणि भाविकांनीही यावर चिंतन केलेले दिसते.

प्रसिद्ध भावगीतकर सुर्यकांत खांडेकरांनी एका सुंदर भावगीतात परमेश्वराला असेच काही विचारले आहेत. खरे तर सूर्यकांतजींचे व्यक्तिमत्त्व एका सात्विक आणि भाविक व्यक्तीचेच आहे. पण तरीही त्यांना ईश्वराकडून त्यांच्या श्रद्धेला पुष्टी देणारा होकार हवा आहे. म्हणून आपल्या कवितेत ते विचारतात, मातीतून एक तांबूस कोंब उगवतो, पुढे त्याला चिमुकली पाने येतात आणि त्याचे फुलझाड बनते. एक दिवस त्याला नाजूक डहाळ्या फुटतात. त्या नाजूक डहाळ्यांच्या अजून हळुवार झालेल्या टोकांवर मग सुंदर रंगाच्या कळ्या उमलतात, त्यांची सुगंधी फुले होतात. सगळ्या आसमंतात तो सुवास दरवळत राहतो. कवी विचारतात, हे परमेश्वरा, तूच त्या सुंगधाचा निर्माता असतोस का रे? तूच त्या फुलांच्या कोशात लपून बसलेला असतोस का?

त्या फुलांच्या गंधकोषी,
सांग तू आहेस का?

सगळ्या जगाला प्रकाशमान करण्यासाठी दिवसभर तळपणारा तुझा सूर्यतारा सायंकाळी अस्तास जातो तेव्हा तुझ्या अमर्याद आकाशात असंख्य तारे चमकू लागतात. त्यांना युगानुयुगे पुरेल इतकी ऊर्जा कोण पुरवते रे? तूच ना?

त्या प्रकाशी तारकांच्या
ओतिसी तू तेज का?

तुझ्या नभातून वायू सतत इकडून तिकडे वेगाने फिरत असतो. त्यातूनही अनेकदा आगळेवेगळे सूर ऐकू येतात. तुझी अवघी निर्मितीच जणू सतत एक गीत गुणगुणत असते असे वाटते. त्या अविरत संगीताच्या मागे उभा असलेला मुरलीधर तूच ना रे?

त्या नभांच्या नीलरंगी
होऊनिया गीत का
गात वायूच्या स्वरांनी,
सांग तू आहेस का?
त्या फुलांच्या गंधकोषी

भगवान श्रीकृष्णांनी गीतेत सांगितले आहे. "समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।" (भगवद्गीता ९/२९) म्हणजे मी सर्व प्राणीमात्रात समानपणे सामावलेलो आहे. सुर्यकांतजी त्यांच्या अदृश्य ईश्वराला तोच प्रश्न विचारतात. 'माणसाचा प्राण म्हणून तूच त्याचे सगळे जीवन चालवत असतोस ना?' निसर्गात प्रचंड उत्पात घडवणारी वादळासारखी, विद्युलतेसारखी तेजःपुंज शक्ती किंवा जीवनाची निर्मिती शक्य करणाऱ्या अमृताने भरलेल्या मेघातील सृजनशक्ती तूच आहेस ना?

मानवाच्या अंतरीचा
प्राण तू आहेस का?
वादळाच्या सागराचे
घोर तें तू रूप का?
जीवनीं या वर्षणारा,
तू कृपेचा मेघ का?
आसमंती नाचणारी
तू विजेची रेघ का?
त्या फुलांच्या गंधकोषी...

अवघ्या ब्रम्हांडात अगदी सूत्रबद्धपणे, शांतपणे युगानुयुगे सुरू असलेली प्रचंड कामे पाहिली की, माणसाला खात्री होते या सर्वामागे एक महाबुद्धिमान दिव्य शक्ती आहे, तिची अनंत काळासाठी आखलेली एक भव्य योजना अविरत कार्यरत आहे.

गाईला जेव्हा वासरू होते तेव्हा त्याच्या पोषणासाठी तिला तत्काळ दुध येणे सुरू होते आणि ते वासरू स्वावलंबी झाले की, त्याच्या मातेला आपोआप येणाऱ्या जीवनरसाचा पुरवठा आपोआप बंदही होतो? हे कसे काय? सर्वच प्रजातीतील मातांच्या लेकरांची एवढी काळजी घेणारी ती अदृश्य शक्ती आहे तरी कोण? 'देवा, तूच ही व्यवस्था करून ठेवली आहेस ना?' असे सुर्यकांतजी कुतूहलाने विचारतात. कारण खरेच आहे. या विश्वाचे संचालन इतके सूत्रबद्धपणे सुरू असते की, फारसा विचार न करणाऱ्यालाही त्याचे आश्चर्य वाटावे. नवजात शिशूच्या पालनपोषणाची, आरोग्याची व्यवस्था देवाने त्याच्या मातेच्या शरीरातच निर्माण होणाऱ्या दुधात करून ठेवलेली असते. तीही कालबद्ध. असेच या जगात काहीतरी पराक्रम केलेल्यांच्या, कष्टकाऱ्यांच्या डोळ्यांत एक तेज आलेले असते. तेही ईश्वरी तेजच नसते का?

जीवनी संजीवनी तू
माऊलीचें दूध का?
कष्टणाऱ्या बांधवांच्या
रंगसी नेत्रांत का?

ईश्वराचे अमूर्त, अदृश्य, निर्गुण, निराकार रूप ही तर अनेक धर्मांची धारणा आहे. त्यात ते सगळे मानवाला देवाने आपल्या रुपात निर्माण केले आहे असेच मानतात. म्हणून कवी विचारतो, 'देवा तुझे दृश्य, साकार रूप म्हणजेच आम्ही मानव ना, लहान बालकाच्या निरागस हसण्यातून तूच प्रकट होत असतोस ना?

मूर्त तू मानव्य का रे?
बालकांचे हास्य का?
या इथें अन् त्या तिथें रे,
सांग तू आहेस का?
त्या फुलांच्या गंधकोषी....

कधी कधी मनस्वी कवींनी निर्माण करून अर्धवट सोडून दिलेले आणि प्रश्नातच त्यांची उत्तरे खुबीने गुंफलेले विचारही अनुभवणे सुखद असते. जीवनावरील श्रद्धा वृद्धिंगत करणारे ठरते.

# 'अनुकरण' करा पण...





संवाद

गुरुनाथ तेंडुलकर

एका दिवंगत राजकीय नेत्याच्या पुतळ्याच्या अनावरण समारंभाला मी उपस्थित होतो. त्यावेळी त्या कार्यक्रमासाठी काही मंत्री, अनेक आमदार, खासदार आणि अनेक व्ही. आय. पी जमले होते. पोलीस बंदोबस्तही अर्थातच अगदी कडक ठेवला गेला होता. त्या प्रसंगी दोन पोलीस शिपाई आपापसात बोलताना मी ऐकले.

एकजण दुसऱ्याला सांगत होता. 'हे मोठ्या लोकांचे पुतळे असे चौकात कशापायी उभारतात कळत नाय बाबा... आजचे ठीक, आज मंत्री आले म्हणून बंदोबस्ताला आपण सगळे आहोत. पण उद्यापासून काय? उद्या या पुतळ्याची कुणी विटंबना केली, तर दंगल होणार नी आपल्यालाच त्रास...!'

एकंदरीत काय त्या बिचाऱ्या पोलीस शिपायाच्या दृष्टीने तो चौकातला पुतळा म्हणजे एक आपत्तीच होती. आणि त्याचे म्हणणेही खरेच होते.

पुतळे उभारून आपण काय साधतो?

फक्त विभूतीपूजा!, व्यक्तिपूजा!

सभा संमेलनातून, वृत्तपत्रांतून, रेडिओ, टी.व्ही.वरील परिसंवादातून अनेक बुद्धीवादी आणि विचारवंत मंडळी या व्यक्तीपूजेच्या, विभूतीपूजेच्या विरोधात आपली मते मांडताना आपण पहातो. तरीही...

विभूतीपूजेमागची मानसशास्त्रीय कारणे शोधणे अधिक सयुक्तिक ठरेल असे मला वाटते.

व्यक्तिपूजा किंवा विभूतीपूजेमागचे एक महत्त्वाचे मानसशास्त्रीय कारण म्हणजे माणसाची अनुकरणशीलता.

लहान मुल त्याच भाषेत बोलते ज्या भाषेत त्याच्या आजुबाजूची मोठी माणसे बोलतात.

इंग्रजांच्या राज्यात आपण गोऱ्यासाहेबाच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावीत होऊन पुरुषांनी पँट, कोट, हॅट नि टाय वापरायला सुरुवात केली. गोऱ्या मॅडमच्या सुटसुटीत गोल झग्याने प्रभावित होऊन स्त्रियांनी नऊवारी लुगड्यांऐवजी पाचवारी गोल साड्या वापरायला सुरुवात केली. पोषाखातील हे बदल आपण स्विकारले. सुरुवातीस फॅशन म्हणून, आणि नंतर जीवनपद्धती म्हणून.

आपली भाषा, आपले जेवण खाणे, पोशाख, रीतीरिवाज, सण, उत्सव प्रत्येक बाबतीत आपण कुणा ना कुणाचे अनुकरण करतोच की.

विभूतीपूजेचे दुसरे कारण म्हणजे प्रत्येक माणसाच्या मनात दडलेली एक सुप्त इच्छा. ही इच्छा म्हणजे मोठेपणाची इच्छा. आपण आहोत त्यापेक्षा अधिक मोठे होण्याची इच्छा. अर्थात अशी इच्छा बाळगण्यात गैर काहीच नाही. आज आहोत त्यापेक्षा अधिक मोठे होण्याच्या या इच्छेमुळेच, तर आज माणसाची प्रगती झालेली आपण पाहतो.

'ठेविले अनंते तैसेची राहावे.' हे आपल्यापैकी बहुतेकांना मान्य नसते म्हणूनच आहे त्यापेक्षा अधिक मोठे होण्याचा आपण सर्वजण प्रयत्न करतो. मोठे होण्याच्या या प्रयत्नांचाच एक भाग म्हणजे मोठ्या माणसांचे अनुकरण करून त्यानुसार वागणे... आणि या आदर्शाच्या शोधातच सुरू होते विभूतीपूजा.

पण दुर्दैवाने बहुतेकांच्या बाबतीत ही विभूतीपूजा केवळ बाह्य स्वरूपापुरतीच मर्यादित राहते. म्हणजे आदर्शातील नेमके जे घ्यायचे ते न घेता नको तेच घेतले जाते. ज्याला आपण 'आदर्श' मानतो त्याचे गुण आत्मसात न करता केवळ त्याच्या सवयी तेवढ्या उचलल्या जातात. त्याच्या केवळ राहणीमानाचे अनुकरण केले जाते.

कारण? कारण अगदी सोपे आहे.

बाह्य राहणीमानाचे अनुकरण करणे फार सोपे असते. ज्या गोष्टी अंगीकारायला कठीण त्या गोष्टींचे अनुकरण केले जात नाही आणि ज्या गोष्टी सोप्या तेवढ्याच स्वीकारल्या जातात. अमिताभ बच्चनच्या हनुवटीवरील खास शैलीतली दाढी बघून घेऊन अनेक मध्यमवयीन पुरुष तशा प्रकारची दाढी वाढवायला लागलेत.

बरं, हे अनुकरण आजचेच आहे असे नव्हे. लोकमान्य टिळकांच्या काळातही हेच होते. लोकमान्य टिळक सुपारी खात असत. टिळकांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून त्यावेळी म्हणे पुण्यातील अनेक तरुणांनी सुपारी खायला सुरुवात केली होती. 'कित्ता' गिरवणे कठीण म्हणून केवळ 'आडकित्ता' घेतला. पंडीत नेहरू पंतप्रधान असताना त्यांचे पाहून अनेक पुरुष आपापल्या शर्टाला, कोटाला गुलाबाचे फुल लावून फिरायचे. नेहरूंची प्रज्ञा, प्रतिभा मिळवणे अवघड पण शर्टाच्या खिशात गुलाबाचे फुल खुपसून मिरवणे सोप्पे.

शर्टाला गुलाबाचे फुल लावून मिरवणाऱ्यांपैकी किती जणांनी पंडितजींची पुस्तके आणि लेख वाचले असतील? त्यांच्या सारखे लिहिणे, तर दूरच पण त्यांनी लिहिलेले तरी किती जणांनी वाचले असेल?

नरेंद्र मोदीजी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांच्यासारखे जॅकेट घालून मिरवायची फॅशनच सुरू झाली.

पण आंधळेपणाने केवळ बाह्य गोष्टींचे अनुकरण केल्याने माणूस गोत्यात येऊ शकतो याची ही एक कथा...

एक तरुण पत्रकार ब्रिटनचे त्या काळचे पंतप्रधान सर विन्स्टन चर्चिल यांची मुलाखत घ्यायला जाणार होता. चर्चिलसाहेबांबरोबर भेटीची वेळ ठरवली होती. हा पत्रकार तसा नवखाच होता. चर्चिल साहेबांच्या भेटीला जाताना त्या तरुण पत्रकाराला त्याच्या वृत्तपत्राच्या संपादकांनी अनेक सूचना दिल्या होत्या. 'बघ, एका फार मोठ्या विद्वान आणि अत्यंत मिश्किल स्वभावाच्या माणसाला भेटायला जातो आहेस तेव्हा जरा सांभाळूनच... त्या मोठ्या लोकांचे रीतभात वेगळे असतात. त्यांच्या चालीरीती वेगळ्या असतात. तेव्हा जरा जपून... ते कसे वागतात ते बघ. नीट निरीक्षण कर आणि नंतरच काय ते कर.' ठरल्याप्रमाणे हा तरुण पत्रकार चर्चिलसाहेबांना भेटायला गेला. त्याने प्रश्न लिहून आणले होते. ते प्रश्न तो विचारीत होता. चर्चिलसाहेब त्याच्या प्रश्नांना नीटपणे उत्तरे देत होते. त्या पत्रकाराने चर्चिलसाहेबांना अडचणीत आणणारा एक प्रश्न विचारला आणि त्या प्रश्नाला सफाईने बगल देताना चर्चिल साहेबांनी मध्येच विचारले, 'चहा घेणार ना?'

'अं... अं... नको.'

'नको म्हणण्यात काही दम दिसत नाही... घे... मला तुझ्याबरोबर चहा घ्यायला आवडेल... चालेल ना?'

'अं... चालेल...'

चर्चिल साहेबांनी चहाची ऑर्डर दिली. चहाची किटली, दुधाचे छोटे भांडे, साखर आणि तीन चार रिकामे कप असा तो सारा सरंजाम आला. त्याच बरोबर मस्का आणि पावाच्या काही स्लाईस, काही बिस्किटे वगैरे सुद्धा होती. चर्चिल साहेबांनी त्यांच्या कपात चहा ओतला. भरपूर दूध ओतून त्यात तीन चार चमचे साखर टाकली.

या तरुण पत्रकाराने सुद्धा त्यांचे पाहून आपल्या कपात भरपूर दूध ओतून तसाच चहा बनवला आणि चार चमचे भरून साखर घातली. वास्तविक त्याला एक चमचा साखर पुरेशी होती. पण त्याने विचार केला... 'असेल बुवा या मोठ्या लोकांची पद्धत. आपण गरीब, सर्वसामान्य, आपल्याला एवढी साखर परवडत नाही म्हणून कदाचित आपण कमी साखर खायची सवय लावून घेतली असावी.'

असा विचार करून त्या पत्रकाराने देखील त्याच्या चहात चार चमचे साखर घातली. इकडे चर्चिल साहेबांनी एक पावाचा तुकडा उचलला नि त्याच्यावर भरपूर मस्का चोपडला.

त्यांचे बघून पत्रकारानेही तसेच केले.

चर्चिल साहेबांनी तो मस्का लावलेला पावाचा तुकडा बशीत ठेवला नी त्यावर तो सगळा चहा हळूहळू ओतला.

आता मात्र या पत्रकाराचे डोकेच चक्रावले. पण करतो काय ?

'असेल बुवा या मोठ्या लोकांच्यात ही पद्धत...' म्हणून त्याने देखील तशाच प्रकारे एका पावाच्या तुकड्याला मस्का चोपडला, बशीत ठेवला नि तो चार चमचे साखर घातलेला चहा त्याच्यावर ओतला. त्या गरम चहाने मस्का वितळून वर तरंगत होता.

हे आता कसे खायचे...?


शिसारी येऊन त्या पत्रकाराने ती बशी उचलली, डोळे मिटले आणि तोंडाला बशी लाऊन एकदाचे कसेबसे ते मिश्रण गिळले... गिळवत नव्हते तरीही घशाखाली घातले...

'सुटलो बुवा एकदाचा...' असे मनाशी म्हणून, निश्वास सोडून त्या पत्रकाराने डोळे उघडले आणि पाहतो तो काय...?

चर्चिल साहेबांनी पावावर चहा ओतलेली ती बशी उचलून आपल्या खुर्चीजवळ बसलेल्या कुत्र्यासमोर ठेवली होती अन् स्वतःसाठी वेगळा चहा बनवायला सुरुवात केली होती...

आंधळेपणे अनुकरण करण्यातून हे असेही घडते. म्हणूनच यापुढे कुणाचेही अनुकरण करताना जरा जपूनच.

# सुदामाचे मित्र प्रेम



विशेष

भालचंद्र ठोंबरे

पुराणातील श्रीकृष्ण व सुदाम्याची मैत्री ही कोणत्याही प्रकारची उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, असा भेदाभेद न पाळता असणाऱ्या अतूट मैत्रीचे प्रतीक आहे. तसेच ते सुदाम्याने आपल्या परम मित्रासाठी केलेल्या त्यागाचेही प्रतीक मानले जाते.


भगवान श्रीकृष्ण व सुदामा हे संदीपनी ऋषींच्या गुरुकुलात अध्ययन करीत होते. या जीवनात गुरुची आज्ञा पाळणे, गुरू सांगतील ती सेवा करून ज्ञान मिळवणे हे अपेक्षित असते. एके दिवशी गुरुपत्नीने श्रीकृष्ण व सुदामा यांना जंगलातून लाकडे आणण्यास सांगितले. जाताना सुदाम्याजवळ एका पोतडीत चणे देऊन भूक लागल्यास तुम्ही दोघेही यातील अर्धेअर्धे घ्या असे सांगितले. जंगलात गेल्यानंतर अचानक आलेल्या पावसापासून रक्षण करण्यासाठी दोघेही एका झाडावर चढले. श्रीकृष्ण बसले त्यापेक्षा उंच व न दिसेल अशा ठिकाणी सुदामा जाऊन बसला. थोड्या वेळाने सुदामाला भूक लागली. तेव्हा त्याने पोतडीतील चणे हळूहळू खाण्यास सुरुवात केली. कोणी काही तरी खात असल्यासारखा आवाज आल्याने कृष्णाने सुदामाला विचारले, सुदामा कसला आवाज येतोय? तू काही खात आहेस का? तेव्हा सुदामा म्हणाला काही नाही. थंडीमुळे माझे दात कडकडा वाजत आहेत, त्याचा आवाज आहे. असे म्हणून सुदाम्याने सर्व चणे खाऊन टाकले.

या संदर्भात एका पौराणिक आख्यिकेनुसार संदीपनी ऋषींच्या गुरुकुलापासून थोड्या अंतरावर गावात एक गरीब वृद्ध ब्राह्मण स्त्री राहत असे. ती दिवसभर गावात भिक्षा मागून ते सेवन करीत असे. एकदा सततच्या पावसामुळे तिला पाच दिवस सतत उपास घडला. सहाव्या दिवशी ती गावात फिरत असतात तिला संध्याकाळच्या समयी एक पोतडी थोडे चणे दान म्हणून मिळाले. उद्या सकाळी देवाला नैवेद्य अर्पण करून मगच आपण त्याचे ग्रहण करू या विचाराने तिने ते ठेवून दिले. काही चोरांनी धनाच्या आशेने ती पोतडी पळवली. चोरांची चाहूल लागताच वृद्ध ब्राह्मणीने गलबला केला. चोर पळून गेले ते संदीपनी ऋषींच्या आश्रमात लपले; परंतु तेथूनही पळून जाताना त्यांच्या जवळील पोतडी आश्रमात पडली.

इकडे चण्याची पोतडी चोरी जाताच भुकेल्या वृद्ध ब्राह्मणीने कळवळून चोरांना श्राप दिला की, जो कुणी या पोतडीतील चणे खाईल तो कायम दारिद्र्यात राहील. ही शापवाणी जंगलातून परत येणाऱ्या व ही घटना पाहणाऱ्या सुदामाच्या कानी पडली.

दुसऱ्या दिवशी गुरू पत्नीला झाडताना आश्रमात ही पोतडी सापडली. ती उघडून पाहता त्यातील चणे तिला दिसले. तेव्हा जंगलात लाकडे आणण्यासाठी जाणाऱ्या कृष्ण व सुदामासाठी तिने ही पोतडी सुदामाच्या हवाली केली व भूक लागल्यास यातील चणे दोघांनी मिळून ग्रहण करा असे सांगितले. पोतडी हाती पडतात व त्यातील चणे पाहताच सुदामाला वृद्ध म्हातारीची शापवाणी आठवली. तेव्हा सुदामाने विचार केला मी मूळचाच एक गरीब आहे त्यामुळे मी गरिबीतच राहिल्याने फारसा फरक पडणार नाही. मात्र श्रीकृष्ण व त्याचे पिता एक प्रतिष्ठित व संपन्न घराण्यातले आहेत त्यांना जर गरिबी आली, तर आपल्या परम मित्राला गरिबीत आयुष्य घालवावे लागेल. त्यामुळे कान्हाने (श्रीकृष्णाने) हे चणे खाल्ल्यास आपल्या मित्राला नाहक वृद्ध ब्राह्मणीच्या कोपाला बळी पडावे लागेल. म्हणून सुद्धा सुदामाने सर्व चणे स्वतःच खाऊन टाकले. अशाप्रकारे मित्र प्रेमासाठी स्वतः सुदामाने दारिद्र्यात राहण्याचा धोका पत्करला. सर्वज्ञानी भगवान श्रीकृष्णाला यांचे ज्ञान होते, म्हणूनच जेव्हा सुदामा कृष्णाच्या भेटीला येतो तेव्हा सुदामाचा हा त्याग जाणून भगवान श्रीकृष्ण त्याला आलिंगन देऊन साश्रुनयनाने त्याचे चरण धुतात व सुदामाने काहीही न मागता त्याला सर्व प्रकारची धनसंपत्ती सुख-समृद्धी प्रदान करतात.

# गणगोत



'गणगोत'चा यंदाचा पहिलाच दिवाळी अंक बैलगाडी विषयावर आधारित आहे. आपला देश कृषिप्रधान असून बैलगाडी म्हणजे बळीराजाच्या नित्याच्या कामातली एक महत्त्वाची गोष्ट. भारतभर बैलगाडीचे कित्येक प्रकार आढळून येतात; पण आज यांत्रिकीकरणामुळे त्या कमी होत चालल्या आहेत.

बैल, बळीराजा आणि बैलगाड्यांशी असलेले प्रेम, आठवणी, लेख आणि कविता 'गणगोत'मध्ये वाचावयास मिळतात. विविध लेखकांनी आपल्या लेखात बैलगाडीवरचे आपले भावविश्व अधोरेखित केले आहे. वसंत आबाजी डहाके, पांडुरंग सुतार, देवीदास सौदागर, सुदाम राठोड, संतोष पवार, निरंजन मुडे, स्वप्नील मेश्राम, लक्ष्मण खेडेकर, सुनील यावलीकर इत्यादी कवींनी केलेल्या कृषिमंथनातून कविता विभाग सजला आहे. समीर गायकवाड, रावसाहेब काळे, तुळशीराम मापारी, दीपक बोरगावे, अश्विनी नांदेडकर, रवींद्र पवार, पांडुरंग कोकरे, वैशाली पाटील, विधी पळसापुरे, संध्या साठे - जोशी इत्यादी लेखकांनी बैलगाडीच्या आठवणी समरसून सांगितल्या आहेत.

संपादकः **रवींद्र चव्हाण**
पानेः १२५,
किंमतः रु.३५०/-

# राशी-भविष्य

## दि.१० नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर

**दिनविशेषः- दि.१० नोव्हेंबरः-** गोविंदबाबा रोंघे- पुण्यतिथी, नागपूर, **दि.११ नोव्हेंबरः-** अवधुतानंद स्वामी महाराज पुण्यतिथी, जानेफळ, **दि. १२ नोव्हेंबरः-** प्रबोधिनी एकादशी * पंढरपूर यात्रा, * संत नामदेव महाराज जयंती, **दि. १३ नोव्हेंबरः-** तुलसीविवाह प्रारंभ, **दि. १४ नोव्हेंबरः-** पंडित नेहरू जयंती * क्रांतीवीर लहुजी साळवे जयंती * वैकुंठ चतुर्दशी उपवास **दि.१५ नोव्हेंबरः-** गुरुनानक जयंती * पौर्णिमा प्रा. पहाटे ६.१९ मिनिटांनी समाप्त उ. रा. २.५८ मिनिटांनी.

**मेष — सल्ला/ मार्गदर्शन घ्या.**
या सप्ताहात प्रकृतीच्या काही तक्रारी येतील, पण रिपोर्ट सगळे नॉर्मल येतील. कलाकार, गायक, समीक्षक यांना या आठवड्यातील दिवस फलदायी ठरणार आहे. वडिलोपार्जित संपत्तीपासून फायदा होईल. महत्त्वाचे निर्णय घेताना मात्र अनुभवी व्यक्तींचा सल्ला घेऊनच निर्णय घेणे योग्य ठरेल.

**वृषभ — प्रवास घडेल.**
नोकरी/व्यवसायातील कामानिमित्त प्रवास करावा लागेल. प्रवासात मात्र दगदग होईल. नातेवाईकांकडून सुखद समाचार मिळतील. आपल्यामध्ये असलेली जिद्द आपल्या कामावरील आत्मविश्वास वाढवेल. आपली मते आपण स्पष्टपणे मांडू शकाल; नोकरीत असणाऱ्यांनी आपल्या कामात येणारे अडथळे वरिष्ठांकडे स्पष्टपणे सांगितले तरच तुमचा त्रास कमी होईल.

**मिथुन — सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.**
आपल्या हातून घडणारे समाजकार्य आपली सामाजिक प्रतिष्ठा वाढवेल. आपणास एखाद्या कार्यक्रमात भाषण देण्याची/ सत्काराची वेळ येईल. आपल्या हातून दानधर्म गरजवंतांना मदत दिली जाईल. संततीच्या उत्कर्षाची वार्ता कानी येईल.

**कर्क — मन ताब्यात ठेवा.**
आपल्या ध्येयपूर्तीसाठी, आपल्याला आपल्या मनावर ताबा ठेवावाच लागेल. भावनेच्या आहारी जाऊ नका. विवेकबुद्धी जागृत ठेवून आपले आचरण शुद्ध ठेवावे. आपल्याकडून कोणाचा अपमान होणार नाही. कुणाचे मन दुखावले जाणार नाही, याची काळजी घ्या. नोकरीत बदल संभावतो.

**सिंह — भेटीगाठीचा प्रसंग.**
जवळच्या व्यक्ती/आप्तस्वकियांच्या भेटीगाठीचा प्रसंग येईल. त्यातून आनंद मिळेल. काव्यलेखन/नाटक करणाऱ्यांना आनंद मिळेल व धनही मिळेल. आध्यात्मिक गोष्टीचा ओढ राहील. तसेच धार्मिक वृत्ती वाढेल. महिलांनी वेळेचे भान ठेवून कामाला वेळ द्यावा.

**कन्या — गरजेचे तेवढेच बोला.**
वरिष्ठांशी किंवा शेजाऱ्याशी बोलताना गरजेपुरतेच बोला, नसता बोलतांना काही तरी वेगळेच बोलून गैरसमज होतील. नको त्या गोष्टी बाहेर येतील तेव्हा कामापुरतेच बोला. व्यवसायात मोठी गुंतवणूक करणे सध्या तरी टाळावे. मुलांच्या बाबतीत घेतलेले निर्णय योग्य ठरतील.

**तूळ — तडजोडीतून सफलता.**
आपणास आपल्या कामात सफलता मिळेल, पण त्यासाठी तुम्हाला केलेली/तडजोड कारणी राहील. तडजोडीमुळेच तुम्हाला तुमच्या कामात सफलता मिळेल. व्यवसायातून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न वाढवावे लागतील. आर्थिक बचत कशी करता येईल, याचा विचार करा.

**वृश्चिक — मनोरंजन होईल.**
आपले दिवस चैन/मनोरंजनात मजेत जातील. त्यातून तुम्हाला आनंद मिळेल. सर्वच दिवस आनंद देणारा, उत्साह वाढवणारा हा आठवडा राहील. तुमचे विचार इतरांना पटतील, त्याचा तुम्हाला वेगळाच आनंद वाटेल. कुटुंबात नवीन सदस्य येणार असल्याची सुवार्ता मुलांकडून ऐकावयास मिळेल, कुटुंबातील आनंद वाढेल.

**धनू — समाधान लाभेल.**
आपण करीत असलेली कामे व मुलांची अभ्यासाची प्रगती पाहून मनाला समाधान लाभेल. आपण योग्य दिशेने वाटचाल करीत असल्याची जाणीव होईल. आरोग्याच्या तक्रारीसाठी योग साधनेला महत्त्व द्या. महिलांनी दुसऱ्याच्या वादात/ भांडणात मध्यस्थी करणे टाळावे.

**मकर — वरिष्ठांशी संवाद.**
आपला वरिष्ठांशी सुसंवाद होऊन सकारात्मक चर्चा होईल, आपणास कामाचे योग्य मार्गदर्शन मिळेल. महत्त्वाची कामे या दिवसात पूर्ण होतील. दुसऱ्यांशी बोलताना विचार करून बोला. कामाव्यतिरिक्त इतर गोष्टींचा विषयच काढू नका.

**कुंभ — गुंतवणूक करू शकाल.**
व्यवसायाच्या नफ्यातून आपण गुंतवणूक करू शकाल. ती तुम्हाला भविष्यात उपयोगी पडेल. व्यवसायातून उत्तम नफा मिळेल, तुम्हाला आर्थिक टंचाई भासणारच नाही. ठरलेले प्रवास पुढे ढकलले जातील. कोर्टाच्या कामात अडथळे येतील व मनस्ताप होईल.

**मीन — पथ्यपाणी सांभाळा.**
मधुमेह, हृदयाचे विकार असणाऱ्यांनी पथ्यपाणी सांभाळावे. आरोग्याकडे दुर्लक्ष करणे अंगावर बेतेल. विद्यार्थ्यांना स्पर्धेत उत्तम यश मिळेल. त्यांनी कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालून वेळ वाया घालवू नका. महत्त्वाची कामे दुसऱ्यांच्या भरवशावर ठेवू नका.

**।। इति शुभं भवतू ।।**

अविनाश अंजनकर, अकोला

# रतन टाटाः दुर्बलांची काळजी घेणारे नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व



**नरेंद्र मोदी**
पंतप्रधान



श्री रतन टाटाजी आपल्याला सोडून गेले त्याला एक महिना झाला आहे. गजबजलेल्या शहरांपासून ते छोटी शहरे, अगदी गावांपर्यंत, समाजातल्या प्रत्येक क्षेत्रात त्यांची उणीव तीव्रतेने जाणवत आहे. प्रस्थापित उद्योगपती, होतकरू उद्योजक आणि मेहनती व्यावसायिक सर्वांनीच त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. पर्यावरणाप्रती सजगता आणि परोपकाराला वाहून घेतलेल्या प्रत्येकालाही तितकेच दुःख झाले. त्यांच्या निधनाने देशाला तर त्यांची अनुपस्थिती तीव्रतेने जाणवली त्याच बरोबर जगालाही ती जाणवली.

युवकांसाठी रतन टाटा प्रेरणास्थान होते, स्वप्ने ही साकारायची असतात आणि करुणा आणि विनम्रता बाळगत यश साध्य होऊ शकते याचे स्मरण ते करून देतात. इतरांसाठी त्यांनी भारतीय उद्योजकतेची सर्वोत्कृष्ट परंपरा सादर केली आणि प्रामाणिकपणा, सर्वोत्कृष्टता आणि सेवा या मूल्यांप्रती ठाम कटिबद्धता त्यांनी जोपासली. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने आदर, सचोटी आणि विश्वासार्हता जपत जगभरात नवी शिखरे गाठली. तरीही अतिशय विनम्रतेने आणि दयाळूपणे त्यांनी हे यश स्वीकारले.

इतरांची स्वप्ने साकारण्यासाठी ठाम आधार देणे हा रतन टाटा यांचा एक अनोखा गुण होता. अलीकडच्या वर्षात भारताच्या स्टार्ट अप परिसंस्थेचे मार्गदर्शक म्हणून ते ओळखले जात असत. अनेक आशादायी प्रकल्पांमध्ये त्यांनी गुंतवणूक केली. युवा उद्योजकांच्या आशा- आकांक्षा त्यांनी जाणल्या आणि भारताच्या भविष्याला आकार देण्याची त्यांची क्षमता ओळखली. अशा युवांना पाठबळ देत धाडस आणि पूर्ण क्षमतेनिशी काम करण्यासाठी अशी स्वप्ने पाहणाऱ्या पिढीला त्यांनी सबल केले. यातून नवोन्मेश आणि उद्योजकतेची संस्कृती निर्माण होण्यासाठी मोठी मदत झाली आणि याचा येत्या दशकांमध्ये भारतात सकारात्मक प्रभाव जारी राहील याचा मला विश्वास आहे.

त्यांनी नेहमीच सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार केला आणि भारतीय उद्योगाने जागतिक मापदंड स्थापित करण्याचा आग्रह ठेवला. हा दृष्टीकोन भारताला, जागतिक तोडीची गुणवत्ता बनवण्यासाठी आपल्या भावी उद्योजकांना प्रेरणा देत राहील याचा मला विश्वास आहे.

बोर्डरूम किंवा सहकाऱ्यांपुरती अशी त्यांची महानता मर्यादित नव्हती. सर्व मानवतेप्रती त्यांची परोपकारी दृष्टी होती. प्राण्यांप्रती त्यांचा दयाळूपणा सर्व परिचित आहे, प्राण्यांच्या कल्याणासाठीच्या प्रत्येक प्रयत्नाला त्यांचे सहकार्य राहिले. एखाद्या व्यवसाय प्रकल्पाप्रमाणेच त्यांच्या जीवनाचा भाग बनलेल्या त्यांच्या श्वानाचे फोटो ते अनेकदा सामायिक करत. त्यांचे जीवन आपल्याला, खरे नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व हे केवळ एखाद्याच्या कामगिरीने नव्हे, तर दुर्बलांची काळजी घेण्याच्या क्षमतेने मापले जाते याचे स्मरण करून देते.

कोट्यवधी भारतीयांच्या दृष्टीने, रतन टाटा यांची देशभक्ती संकटाच्या काळात सर्वात तेजस्वी ठरली होती. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईतील प्रतिष्ठित ताज हॉटेल त्यांनी झपाट्याने पुन्हा उघडणे म्हणजे भारत दहशतवादाला नकार देत एकजुटीने उभा आहे हे राष्ट्राला सूचित करणारे होते.

व्यक्तिगतरित्या मला अनेक वर्षांपासून त्यांना जवळून जाणून घेण्याचा विशेषाधिकार मिळाला. आम्ही गुजरातमध्ये जवळून काम केले, जिथे त्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली, यातील अनेक प्रकल्पांवर त्यांचा खूप जीव होता. काही आठवड्यांपूर्वी, मी स्पेन सरकारचे अध्यक्ष श्री पेड्रो सांचेझ यांच्यासमवेत वडोदरा येथे होतो आणि आम्ही संयुक्तपणे एका विमान संकुलाचे उद्‌घाटन केले जेथे सी-२९५ विमाने भारतात बनवली जातील, रतन टाटा यांनीच यावर काम सुरू केले होते. रतन टाटा यांची अनुपस्थिती आम्हाला फारच जाणवली हे वेगळे सांगायला नको.

मला रतन टाटाजी हे पत्रलेखक म्हणूनही स्मरणात आहेत. ते वारंवार मला निरनिराळ्या मुद्यांवर पत्र लिहीत असत, मग ते प्रशासनाचे विषय असोत, सरकारच्या पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे असो किंवा निवडणूक विजयानंतर अभिनंदनाच्या शुभेच्छा असोत.

जेव्हा मी केंद्र सरकारमध्ये गेलो तेव्हाही आमचा निकटचा संवाद कायम राहिला आणि ते आमच्या राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नांमधील एक वचनबद्ध भागीदार राहिले. रतन टाटा यांनी स्वच्छ भारत मिशनला दिलेला पाठिंबा विशेषत्वाने माझ्या हृदयाच्या जवळ होता. भारताच्या प्रगतीसाठी स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता आणि साफसफाई अत्यावश्यक आहे हे समजून ते या लोकचळवळीचे मौखिक पुरस्कर्ते बनले. ऑक्टोबरच्या सुरुवातीला स्वच्छ भारत मिशनच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त त्यांनी दिलेला मनस्वी व्हिडिओ संदेश मला अजूनही आठवतो. हे त्यांच्या काही शेवटच्या सार्वजनिक दर्शनांपैकी एक होते.

त्यांच्या हृदयाच्या जवळची आणखी एक बाब म्हणजे आरोग्यसेवा आणि विशेषतः कर्करोगाविरुद्धची लढाई. मला दोन वर्षांपूर्वीचा आसाममधील कार्यक्रम आठवतो, जिथे आम्ही राज्यातील विविध कर्करोग रुग्णालयांचे संयुक्तपणे उद्‌घाटन केले होते. त्यावेळच्या त्यांच्या टिप्पण्यांमध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते, की त्यांना त्यांची शेवटची वर्षे आरोग्यसेवेसाठी समर्पित करायची आहेत. आरोग्य आणि कर्करोग सेवा सुलभ आणि परवडण्याजोगी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे मूळ हे त्या रोगांशी लढा देत असलेल्या रुग्णांबद्दलच्या खोल सहानुभूतीमध्ये होते, समाजातील सर्वात दुर्बळांच्या, असुरक्षितांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हेच न्याय्य असल्याचा त्यांना विश्वास होता.

आज जेव्हा आपण त्यांची आठवण काढतो, तेव्हा आपल्याला त्यांनी कल्पिलेल्या समाजाची आठवण होते. जिथे व्यवसाय हा भल्यासाठी असणारी एक शक्ती म्हणून काम करू शकतो, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या क्षमतेचे मूल्य असते आणि जिथे प्रगती ही सर्वांच्या कल्याण आणि आनंदात मोजली जाते. त्यांनी स्पर्श केलेल्या जीवनात आणि त्यांनी जोपासलेल्या स्वप्नांमध्ये ते चिरायू आहेत. भारताला एक चांगले, दयाळू आणि अधिक आशादायी ठिकाण बनवल्याबद्दल पुढच्या पिढ्या त्यांच्या कृतज्ञ असतील.

## अन्वयार्थ

# 'दिल धडकने दो'...!



**न.मा. जोशी**
8805948951

प्राध्यापकी करताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमाप्रमाणे सक्तीच्या असलेल्या रिफ्रेशर कोर्ससाठी मी गोवा विद्यापीठात गेलो होतो. दुसऱ्या वर्षीसुद्धा गेलो तेव्हा माझ्या लक्षात आले, की पहिल्या कोर्समध्ये जे प्राध्यापक शिकवायला होते, जे त्यांनी शिकवले त्याची शब्दशः कॉपीच दुसऱ्या सत्रात होती. मी कुलगुरूंना ही गोष्ट लक्षात आणून दिली. तेव्हा समन्वयक असलेले प्राध्यापक म्हणाले, की शिकवणारे तेच आहेत; पण विद्यार्थी वेगळे असतात. तुम्ही प्राध्यापक मंडळीसुद्धा एकच व्याख्यान १० ठिकाणी जसेच्या तसे देता. कुणाची तक्रार नसते, कारण श्रोते वेगळे असतात.

रिफ्रेशर कोर्समध्ये विद्यार्थी असलेल्या प्राध्यापकांनासुद्धा एक दिवस शिकवावे लागते. माझा नंबर आला तेव्हा एक तास व्याख्यान दिल्यावर विद्यार्थी असलेल्या प्राध्यापकांना मी व्याख्यानातील चार महत्त्वाचे मुद्दे सांगा, असा एक प्रश्न विचारला.

कोणीही योग्य उत्तर तर दिले नाही, कारण विद्यार्थी असलेले प्राध्यापक ऐकण्याच्या मनःस्थितीत नसतात हे माझ्या लक्षात आले. मीही त्यातील एक होतो हे मीदेखील विसरून गेलो होतो. हे सर्व यासाठी सांगत आहे, की सध्या दुसऱ्याचे ऐकायला कोणाला फुरसत नाही. 'जिसे भी देखिये वो अपने आपमे गुम है, जुबां मिली है मगर हम जुबां नही मिलता' अशी स्थिती आहे. मानसशास्त्रज्ञही मान्य करतात की माणसाची ऐकण्याची क्षमता आणि एकाग्रता कमी झाली आहे. त्याची ऐकण्याची एकाग्रता केवळ ९० सेकंद आहे.

अनिल कपूर आणि प्रियंका चोपडाचा एक चित्रपट होता 'दिल धडकने दो'. कुटुंबामधील परस्परांचा अजिबात संवाद नसल्यामुळे कुटुंबातील सारे विभक्त होऊन वेगवेगळे होऊन जातात, अशी या चित्रपटाची स्टोरी होती. राजकारणातही हेच चित्र दिसत आहे. आज त्यामुळे विचारांची लढाई कुठेच दिसत नाही. प्रत्येकाला सत्ता हवी आहे ती केवळ फुकटच्या रेवडीने, घोषणाबाजी आणि नारेबाजीने मिळते यावर राजकीय पक्षांचा विश्वास वाढला आहे.

प्रत्येक भारतीयाची मान गर्वाने उंचावेल, अशा आपल्या लोकशाहीचे अलीकडे होत असलेले वस्त्रहरण, जातीयवाद, प्रांतवाद, धर्मवाद, संप्रदायवाद इत्यादींनी पोखरत चाललेला देश आणि सर्वात म्हणजे राजकीय जीवनातील नीतीमूल्यांची होत असलेली कमालीची घसरण लक्षात घेता संविधानाच्या उद्देश पत्रिकेतील 'आम्ही भारताचे लोक' कुठे जात आहोत हा प्रश्नच पडतो.

आज पार्लमेंट किंवा विधिमंडळातसुद्धा उच्च दर्जाची चर्चा दिसत नाही, विनोद बुद्धीचा कमालीचा अभाव दिसतो. विनोद बुद्धीमुळे सभागृहातील तणाव कमी होतो, असे ब्रिटिश पंतप्रधान चर्चिल म्हणायचे. विनोदाचे एक दोन प्रसंग आठवतात.

रशियाचा हुकूमशहा जोसेफ स्टॅलिनची कन्या श्वेतलाना हीला एका भारतीयाशी लग्न करायचे होते म्हणून तिला भारतात आश्रय देण्याबाबत डॉ. राममनोहर लोहिया लोकसभेत बोलत होते. तेव्हा तारकेश्वरी सिन्हा मध्येच म्हणाल्या, 'अविवाहित डॉ. लोहिया यांना प्रेमी युगुलांच्या भावना काय समजणार?' लोहिया लगेच म्हणाले, 'तारकेश्वरी आपने कभी मुझे चान्स दिया क्या?'

कांद्याचे भाव वाढले होते तेव्हा सभागृहाचे लक्ष वेधून घेण्यासाठी एक खासदार कांद्याची माळ घालून सभागृहात आले होते. अध्यक्ष त्यांना उद्देशून म्हणाले, उद्या ट्रॅक्टरच्या मागच्या टायरचे भाव वाढले तर काय कराल? अशा गमती-जमती व्हायच्या.

आज काय चित्र आहे? एकेकाळी पंडित जवाहरलाल नेहरू, श्यामा प्रसाद मुखर्जी, गणेश वासुदेव उपाख्य दादासाहेब मावळणकर, डॉक्टर राममनोहर लोहिया, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बलराम जाखड, जॉर्ज फर्नांडिस, तारकेश्वरी सिन्हा, यशवंतराव चव्हाण, पिलू मोदी, अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज, मधू दंडवते, मधू लिमये, नानासाहेब गोरे, सोमनाथ चॅटर्जी, पूर्णो संगमा, शिवराज पाटील, बाळासाहेब भारदे, वि.स.पागे, आचार्य अत्रे, सुदाम देशमुख, बीटी देशमुख, किती नावे सांगावीत? आज काय चित्र आहे? जशी प्रजा तसा राजा. आज कुणाला हवे आहे विचारांचे राजकारण? म्हणून तर अनेकदा आपल्या देशातील निवडणुका नारे सोडबाजीच्या भरोशावरच लढल्या गेल्या आहेत. कधी 'गरीबी हटाव देश बचाव', त्या विरोधात 'गरीब को हटाव, इंदिरा हटाव देश बचाओ', कधी 'सिंहासन खाली करो की जनता आई है', कधी 'एक शेरनी सौ लंगुर चिकमग्लूर चिकमग्लूर', कधी इंदिरा गांधींच्या विरोधात 'यह देखो इंदिरा का खेल, खा गई राशन पी गई तेल', 'रोजी दे न सकी जो वह सरकार निकम्मी है, जो सरकार निकम्मी है वह सरकार बदलनी है', असे नारे लावून एक जनआक्रोश निर्माण केल्या गेला होता.

> ### रोटी, बेटी, माटीः
> मंगळसूत्र चोरी आणि म्हैस पळवून नेणे, यासारख्या लंगड्या, बेताल आणि असभ्य टिप्पण्यांनंतर, निवडणुकीच्या प्रचारात आता सर्वात वाईट टिप्पणी म्हणजे- 'घुसखोर तुमच्या मुली हिसकावून घेत आहेत, तुमच्या जमिनी बळकावत आहेत आणि तुमची भाकरी खात आहेत.' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झारखंडच्या निवडणुकीत रोटी, बेटी, माटी या यमकाने आता काल्पनिक भयाचा नवीन वाक्प्रचार तयार केला आहे. 'आम्ही भारताचे लोक' कुठे जात आहोत?

१९८० मध्ये काँग्रेसचा एक नारा फार हिट झाला होता, 'जात पर ना पात पर इंदिरा जी की बात पर मुहर लगेगी हाथ पर', 'आधी रोटी खाएंगे इंदिरा को वापस लाएंगे'. १९८४ मध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर काँग्रेसने नारा दिला होता, 'जब तक सूरज चांद रहेगा इंदिरा तेरा नाम रहेगा।' राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा काँग्रेसचे सरकार बनले. २०१४ मध्ये 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवत, कधीही पूर्ण होणार नाहीत, अशी आश्वासने बिनधास्तपणे देत नरेंद्र मोदी सत्तेत आले. लोकाभिमुख घोषणा, फुकटची रेवडी, दणकेबाज पण निरर्थक भाषणांचा धडाका लावत तिसऱ्यांदा सत्तेत आले. राजकीय पक्षांसाठी आता धर्म, जात आणि प्रदेशाच्या नावावर होणारी फूट हादेखील भारतातील निवडणुकीचा महत्त्वाचा घटक वाटत आहे. त्यांना कोणत्याही प्रकारच्या वैचारिक भानगडीत पडायचे नाही. फुकटची रेवडी आणि काही वेळा भडकाऊ आणि फूट पाडणारी भाषणे करावी लागतात. ज्येष्ठ पत्रकार अजित द्विवेदी म्हणतात की, सर्वच पक्ष या फॉर्म्युल्यावर निवडणूक लढवत आहेत, तर भाजपला अधिक यश का मिळत आहे आणि इतर पक्षांना का नाही? भाजपला अधिक यश मिळत आहे हे खरे आहे; पण लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात हे जितके खरे आहे तितके राज्य निवडणुकांच्या बाबतीत नाही. सध्या महाराष्ट्र आणि झारखंडमध्ये २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुका होत आहेत. जॉर्ज ऑर्वेल यांनी 'पॉलिटिक्स अँड इंग्लिश लँग्वेज' आणि 'व्हाय आय राईट', असे दोन दीर्घ निबंध लिहिले. त्यात राजकारणातील भाषेचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले आहे. 'द प्रिन्सिपल्स ऑफ न्यूजस्पीक' या कादंबरीच्या शेवटी 'ओशनिया' या काल्पनिक निरंकुश देशातील राज्यकर्त्यांच्या मूळ अर्थापेक्षा वेगळे अर्थ असणाऱ्या भाषेचा उल्लेख आहे. भारतातही 'न्यूजस्पीक' आहे. भीक देणे न म्हणता 'सन्मान निधी', 'महिला सन्मान योजना', 'मैय्या सन्मान योजना', 'लाडकी बहीण योजना' म्हणायचे.

झारखंडमध्ये 'इंडिया ब्लॉक'ने वेगवेगळ्या राजकीय घराण्यातील २० जणांना तिकीट दिले आहे, तर भाजपनेही १८ जणांना तिकीट दिले आहे. विरोधी पक्षांनी कुटुंबातील सदस्यांना तिकीट दिल्यास ती घराणेशाही आहे आणि भाजपने तिकीट दिल्यास ती 'परिवार सन्मान योजना' आहे. विरोधी पक्ष देतात ती फुकटची रेवडी असते आणि भाजप देते तेव्हा ती सन्मान करण्याची योजना असते.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक असून राज्य मागासवर्ग आयोगाचे माजी सदस्य आहेत.)
यवतमाळ



## कवडसा

# 'मनन अन् स्वीकार; पण कशाचं?'



**प्रा.डॉ.मोहन खडसे**
9823289010

> माणसाला कोणताही आजार होण्याची कारणं अनेक असतात. त्यात एक कारण हेही असतं की माणसाने त्या आजाराला मनापासून स्वीकारलेले असते. जेवढी मनाची संघर्ष करण्याची इच्छा, तेवढा कोणताही आजार म्हणा की समस्या म्हणा दूर राहू शकते, यात मुळीच शंका नाही. तथागत भगवान गौतम बुद्ध म्हणतात, की तुमचे मन आणि तुमचे विचार हेच खरं तर सर्व काही आहे, कारण जसा विचार तुम्ही कराल तशीच कृती होईल आणि तसेच तुम्ही पुढे-पुढे घडत जाल. जर मन आणि शरीर परस्परांशी चांगलेच जोडलेले आहेत तर मग चांगला आणि सकारात्मक विचारच नेहमी का करू नये?

एखादी गोष्ट चांगली आहे किंवा वाईट आहे तर ती 'तशी' आहे यात शंका नाही मात्र एखाद्याने ती कशी आहे हे मान्य केलं किंवा स्वीकारलं तर त्याला ती तशी वाटू शकते एवढे मात्र खरं. याचाच अर्थ असा की एखाद्याने एखादी गोष्ट चांगली मानली किंवा वाईट मानली तर त्याला ती तशी वाटण्याची शक्यता अधिक असते. जी गोष्ट चांगली वाटली त्याची तशाच प्रकारचे मनन होते आणि जी गोष्ट वाईट समजली जाते त्याचे तसेच मनन होते आणि महत्त्वाचं म्हणजे त्या गोष्टीचा स्वीकार करण्यात आल्यामुळे माणूस जसा विचार करतो ते खरं आहे, असं वाटण्याचीच शक्यता अधिक असते.

माणसाच्या वाटण्याने किंवा समजण्याने तसं काही फारसं होत नसलं तरी त्याच्या विचार करण्याचा मात्र त्याच्या कृतीवर, शरीरावर मात्र परिणाम होतो यात शंकाच नाही. कुणावर अधिक होईल तर कुणावर कमी होईल मात्र त्याचा परिणाम हा होतो, एवढं नक्की! हा परिणाम कधी तात्कालिक असतो, कधी काही काळासाठी असतो तर कधी तो दीर्घ होतो. माणूस त्या विचाराला कसा धरून ठेवतो, किती वेळ धरून ठेवतो, यावर त्याचा परिणामाचा कालावधी हा अवलंबून असतो. कोणत्याही विचाराला सकारात्मक रितीने दीर्घकाळ पकडून ठेवले तर त्याचा परिणाम चांगलाच होण्याची शक्यता आहे आणि एखाद्या नकारात्मक विचाराचे सातत्याने मनन-चिंतन करत राहिले तर त्याचा परिणाम निश्चितपणे वाईटच होण्याची शक्यता सर्वाधिक असते.

खरं म्हणजे ज्या प्रकारे शाकाहारी प्राणी त्यांनी खाल्लेल्या गवताचे अन्नाचे रवंथ करतात तसंच काही माणसं एखाद्या विचाराचं चिंतन मनन करतात म्हणजे ते एका अर्थाने रवंथच करत असतात ज्याचा परिणाम नाकारता येत नाही. नको असलेल्या नकारात्मक वाईट अशा गोष्टींना विचारातून टाळता येत नाही मात्र तरीही त्याचे चिंतन हितकारक होऊच शकत नाही. प्रत्येक बाबतीतच शक्य नाही मात्र अनेक बाबतीत चांगल्या आणि सकारात्मक गोष्टींचे रवंथ माणसाला हितकारक ठरते, यात मुळीच शंका नाही.

कोणत्याही गोष्टीचा विचार करण्याचा परिणाम माणसावर होतो हे विज्ञानानेसुद्धा सिद्ध केले आहे. एखादा लहान मुलगा रस्ता पार करत असेल आणि त्याच वेळेस माणसाचे वाहन वेगात जर असेल तर त्या पोराला इजा होऊ नये म्हणून, ब्रेक मारून थांबवण्याच्या प्रयत्न करण्यात, माणसाच्या हृदयावर म्हणजेच शरीरावर काही परिणाम होतो काय? तर हो नक्कीच होतो अन् तो असा की वाहनधारकाच्या मनात धस्स होतं अन् काही वेळाने त्याचे मन म्हणजे हृदय परत सामान्य होतं. का बरं अन् कसं काय? तर रस्ता पार करणाऱ्या लहान पोराला इजा झाली नाही हे खूप चांगलं झालं, अशा विचारात तो माणूस पुढे निघून जातो अन् रस्ता क्रॉस करणाऱ्या पोराला पार विसरतो म्हणून!

कोणती गोष्ट मनाला लागते किंवा लावून घ्यावी, हा माणूसपरत्वे बदलणारा मुद्दा आहे. चांगली गोष्ट लवकर मनात रेंगाळत नाही मात्र वाईट गोष्ट ही अधिक काळ मनात रेंगाळत राहते. हा माणसाचा सर्वसाधारण स्वभाव असतो. कुणी चांगलं बोललं, कुणी कौतुक केलं, तर त्याकडे माणूस फार वेळ लक्ष देत नाही मात्र कुणी टोचून बोललं, कोणी नजरेने, वागण्याने फटकारलं किंवा नकारात्मक राहिलं तर मात्र माणसाच्या मनात ते रेंगाळत राहण्याची शक्यता अधिक असते. हे झालं सर्वसाधारणपणे मात्र माणसाला असं वाटलं पाहिजे की तो सर्वसाधारणपेक्षा वरच्या स्तरावर जाऊ शकतो. यासाठी सकारात्मकतेची साथ मात्र पक्की धरून ठेवावी लागते अन् नकारात्मकता धरली नाही तरी चालते, कारण ती आधीच माणसाच्या मनात असण्याची शक्यता असते. खरंतर माणसाने स्वतःच्या मनाकडे अधिक लक्ष देण्याची गरज असते. ते दिलं नाही म्हणजे काय होतं हे सांगताना सुप्रसिद्ध शायर शकील बदायुनी म्हणतात -

**दिल की तरफ 'शकील'**
**तवज्जो जरुर हो**
**ये घर उजड गया तो**
**बसाया न जायेगा**

माणसाला कोणताही आजार होण्याची कारणं अनेक असतात. त्यात एक कारण हेही असतं की माणसाने त्या आजाराला मनापासून स्वीकारलेले असते. जेवढी मनाची संघर्ष करण्याची इच्छा, तेवढा कोणताही आजार म्हणा की समस्या म्हणा दूर राहू शकते, यात मुळीच शंका नाही. तथागत भगवान गौतम बुद्ध म्हणतात, की तुमचे मन आणि तुमचे विचार हेच खरं तर सर्व काही आहे, कारण जसा विचार तुम्ही कराल तशीच कृती होईल आणि तसेच तुम्ही पुढे-पुढे घडत जाल. जर मन आणि शरीर परस्परांशी चांगलेच जोडलेले आहेत तर मग चांगला आणि सकारात्मक विचारच नेहमी का करू नये?

(प्रस्तुत लेखक हे प्रसिद्ध स्तंभ लेखक, शिक्षण तज्ज्ञ असून त्यांच्या 'सावित्री फाऊंडेशन, अकोला' च्या माध्यमातून सक्रिय सामाजिक, शैक्षणिक कार्य करतात.)
अकोला
ईमेलः mvkhadse9@gmail.com

# मणिपूरमध्ये अत्याचार करुन महिलेला जिवंत जाळले!

वृत्तसंस्था

**जिरिबाम :** मणिपूरमधील जिरिबाम जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. गुरुवारी रात्री एका ३१ वर्षीय आदिवासी महिलेवर बलात्कार करून तिला जिवंत जाळण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी सशस्त्र हल्लेखोरांनी वेगाने गोळीबार करून गावाला लुटले आणि जाळपोळ केली, असे सांगण्यात येत आहे की हल्लेखोरांनी १७ घरे जाळून टाकली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत पीडितेवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली आहे. पोलिसांनी एफआयआरमध्ये 'बलात्कार आणि हत्या वांशिक आणि सामुदायिक धर्तीवर' असा उल्लेख केला आहे. पीडितेच्या पतीने पोलिसांकडे तक्रार केली आणि हे कृत्य बेकायदेशीर घुसखोरांनी केल्याचे सांगितले; परंतु अद्याप हल्लेखोरांची ओळख पटलेली नाही. पोलीस सूत्रांनी दिलेल्या



माहितीनुसार, हल्लेखोर मणिपूरच्या स्थानिक भागातील असावेत असा संशय आहे. स्थानिक आदिवासी वकिल समितीने (ITAC) एक निवेदन जारी केले की, हल्लेखोरांनी गावात प्रवेश करताच घरांना आग लावली आणि गोळीबार केला. यावेळी गावातील लोक जीव वाचवण्यासाठी जंगलाच्या दिशेने पळू लागले, मात्र एका महिलेचा जाळ्यात अडकून निर्घृण खून करण्यात आला.




## एका मुस्लीम व्यावसायिकाच्या फेसबुक पोस्टमुळे झाला वाद

# बांगलादेशात इस्कॉनवर बंदीची मागणी

वृत्तसंस्था

**ढाका :** बांगलादेशातील चितगावमध्ये कट्टरपंथी इस्लामिक संघटना हेफाजत-ए-इस्लामने शुक्रवारचे नमाज पार पडल्यानंतर इस्कॉनविरोधात रॅली काढली. यामध्ये इस्कॉनच्या भाविकांना पकडून ठार मारण्याच्या घोषणा देण्यात आल्या. इस्कॉनवर बंदी न घातल्यास आंदोलन करू, असे आंदोलकांनी सांगितले. हजारी लेन परिसरात ५ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनेत सहभागी असलेल्यांना अटक करून त्यांना शिक्षा करण्याची मागणी त्यांनी केली.

समोर आलेल्या माहितीनुसार, उस्मान अली या मुस्लीम व्यावसायिकाने फेसबुकवर इस्कॉनला दहशतवादी संघटना म्हटले होते. त्यामुळे हिंदू संतप्त झाले. त्यांनी ५ नोव्हेंबर रोजी चितगावमधील हजारी लेन भागात उस्मानच्या दुकानासमोर निदर्शने केली. यावेळी लष्कराने आंदोलकांवर लाठीचार्ज केला. यामुळे हिंदू आणखी संतप्त झाले. यामध्ये १२ पोलीस आणि अनेक हिंदू जखमी झाले. वृत्तानुसार, यानंतर रात्री अचानक पोलीस आणि लष्कर हजारी लेनमध्ये पोहोचले आणि त्यांनी स्थानिक हिंदूंना मारहाण केली.

### हिंदूंच्या संरक्षणाची भारताकडून मागणी

बांगलादेशी हिंदूंच्या संरक्षणाची मागणी भारतातही करण्यात आली आहे. बांगलादेशात हिंदूंवर सातत्याने हल्ले होत आहेत, काही दिवसांपूर्वीच इस्कॉन संघटनेचे सचिव चिन्मय कृष्ण दास ब्रह्मचारी उर्फ चंदन कुमार धर यांच्यावर ३ महिन्यांत २५० हून अधिक गुन्हे दाखल करण्यात आले होते. चितगावच्या न्यू मार्केटमधील आझादी स्तंभावर राष्ट्रध्वजाच्या वर भगवा ध्वज फडकवल्याचा आरोप त्यांच्यावर होता. या ध्वजावर 'सनातनी' असे लिहिले होते. बांगलादेशात ५ ऑगस्ट रोजी शेख हसिना सरकार पडले. तेव्हापासून, अल्पसंख्याक हिंदू समुदायावरील हल्ल्यांच्या २५० हून अधिक प्रकरणांची नोंद झाली आहे.

# जगप्रसिद्ध सारंगी वादक पंडित राम नारायण यांचे निधन

वृत्तसंस्था

**जयपूर :** जागतिक कीर्तीचे सारंगीवादक पद्मविभूषण पंडित राम नारायण यांचे निधन झाले. शुक्रवार ८ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास निधन झाले. वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पंडित राम नारायण यांनी सारंगीला एक संगत वाद्य म्हणून नव्हे तर एक प्रतिष्ठित एकल वाद्य म्हणून जगभर प्रसिद्धीस आणले होते. २५ डिसेंबर १९२७ रोजी उदयपूर, राजस्थान येथे जन्म झालेल्या पंडित राम नारायण यांची सारंगी यात्रा लहान वयातच सुरू झाली. त्यांच्या समर्पणामुळे ते आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध सारंगी वादक



बनले. त्यांच्या सादरीकरणांनी जगभरातील प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आणि त्यांनी जागतिक मंचांवर सारंगी आणि भारतीय अभिजात संगीताला लोकप्रिय करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत, त्यांना अनेक पुरस्कार मिळाले, ज्यात २००५ मध्ये भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान, पद्म विभूषण यांचाही समावेश आहे.

# भाजप खासदार तेजस्वी सूर्यांविरोधात गुन्हा दाखल

वृत्तसंस्था

**बेंगळुरू :** कर्नाटकातील हावेरी जिल्ह्यातील एका शेतकऱ्याच्या आत्महत्येप्रकरणी भाजप खासदार तेजस्वी सूर्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्याने आत्महत्या केली कारण त्यांची जमीन वक्फ बोर्डाने बळकावली होती अशी भ्रामक पोस्ट सूर्या यांनी सोशल मीडियावर केली होती. दरम्यान, सदर शेतकऱ्याच्या आत्महत्येमागे वित्तीय कारण असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

जानेवारी २०२२ मध्ये शेतकऱ्याचा मृत्यू झाला. शेतकऱ्याने कर्ज आणि पिकांचे नुकसान झाल्यामुळे आत्महत्या केली असल्याचे हावेरीच्या पोलीस

### चुकीची माहिती पसरवली



अधीक्षकांनी सांगितले. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास पूर्ण करून अहवालही सादर केला होता. सूर्या यांच्या पोस्टनंतर कर्नाटकात खळबळ माजली असून सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे. दरम्यान या प्रकरणी दोन कन्नड न्यूज पोर्टलच्या संपादकांविरोधातही एफआयआर नोंदवण्यात आला आहे. हावेरीतील शेतकऱ्याच्या आत्महत्येचा संबंध वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या वादाशी आहे, असा मथळा असलेली बातमी या पोर्टल्सवरुन प्रसिद्ध करण्यात आली होती. या चुकीच्या माहितीमुळे शेतकऱ्यांमध्ये तणाव पसरू शकतो आणि त्यामुळेच गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. 'आतापासून आपण अशा माहितीच्या स्त्रोतांबाबत अधिक सतर्क राहणार आहोत, असे खासदार तेजस्वी सूर्या म्हणाले. कर्नाटकातील वक्फ जमिनीच्या मुद्यावर तेजस्वी सूर्या आणि इतर नेत्यांच्या वक्तव्यानंतर शेतकऱ्यांमध्ये तीव्र चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना वक्फ जमिनीच्या नव्या नोटिसा देणे थांबवण्याचे निर्देश दिले आहेत.

# रामेश्वरम कॅफे स्फोटाचे पाकिस्तानशी धागेदोरे!

## एनआयएच्या आरोपपत्रातून बाब उघड

वृत्तसंस्था...

**बेंगळुरू :** बेंगळुरूमधील व्हाईट फिल्डच्या ब्रुकफिल्डच्या येथील रामेश्वरम कॅफेतील स्फोटप्रकरण राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. या स्फोट प्रकरणाचा पाकिस्तानशी लिंक असल्याची धक्कादायक बाब एनआयच्या तपासातून उघडकीस आली आहे. रामेश्वरम कॅफेतील स्फोट प्रकरणाचे पाकिस्तानशी धागेदोरे असल्याचे उघडकीस आले आहे.



पाकिस्तानमधील दहशतवादी फैजल याने हा स्फोट घडविण्यासाठी पाकिस्तानातूनच हालचाली केल्याचे एनआयएने आरोपपत्रात म्हटले आहे. मंगळुरूमधील कुकर बॉम्ब स्फोटानंतर अब्दुल मतीन अहमद ताहा आणि मुसावीर हुसेन शाजीब बेपत्ता झाले होते.

# खरी शिवसेना, सत्तासंघर्षावर निकाल नाहीच; नव्या सरन्यायाधीशांसमोर होणार सुनावणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** देशाच्या राजकीय इतिहासात प्रथमच शिवसेना वादात फुटलेल्या गटाकडून मूळ राजकीय पक्षावर करण्यात आलेला दावा तसेच अडीच वर्षांपूर्वीचा महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. मात्र, गेल्या अडीच वर्षांपासून तारीख पे तारीख होऊनही आणि मूळ प्रकरण घटनाक्रमापासून माहीत असूनही यावर कोणताही निर्णय न देता थेट आता नव्या सरन्यायाधीशांसमोर हे प्रकरण सोपवून दिले आहे.

महाराष्ट्र सत्तासंघर्ष आणि पक्ष व चिन्ह प्रकरण ही सर्व प्रकरणे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर



सुनावणीसाठी होती. मात्र, राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाही आणि वारंवार थेट टिप्पणी होऊनही कोणत्याही निर्णयाविना सरन्यायाधीश निवृत्त झाले आहेत. त्यामुळे आता हे प्रकरण नवीन सरन्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुरू राहील. विशेष आमदार अपात्रता प्रकरण विधानसभा अध्यक्षांकडे सोपवताना सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी अत्यंत कठोर टिप्पणी केली होती. त्यामुळे महाराष्ट्र सत्तासंघर्षाच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाकडून देशाच्या राजकारणात मानदंड निश्चित केले जातील आणि चंद्रचूड यांच्याच कार्यकाळात महाराष्ट्र सत्तासंघर्षावर निकाल येईल, असे बोलले जात होते. मात्र, हा फोलपणा ठरला असून आता नव्या सरन्यायाधीशांसमोर या प्रकरणाची सुनावणी होईल. राष्ट्रवादीमधील वादसुद्धा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. नियोजित सरन्यायाधीश संजीव खन्ना हे ११ नोव्हेंबरपासून सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील. या सुनावणीच्या खंडपीठात ते देखील आहेत.

## दोन मालवाहू ट्रकमध्ये समोरासमोर धडक

**फोंडा:** दुर्गीणी-धारबांदोडा येथील राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास दोन मालवाहू ट्रकमध्ये समोरासमोर धडक झाल्याने गवी सिद्धया (कर्नाटक) हा चालक गंभीर जखमी झाला आहे. जखमी चालकावर गोमेकॉत उपचार सुरू आहे. कुळे पोलिसांनी अपघाताचा पंचनामा केला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार केए - ३७ -बी -५५८६ क्रमांकाचा ट्रक कर्नाटक राज्यातून फोंडा येथे जात होता. दुर्गीणी पोहचताच चालकाचे नियंत्रण गेल्याने ट्रकची धडक विरुद्ध दिशेने येणाऱ्या केए - २२- सी - १२८७ क्रमांकाच्या ट्रकला बसली. यात कर्नाटक मधून गोव्यात प्रवेश केलेला ट्रकचा चालक जखमी झाला.

# अमेरिकेत माझे भविष्य कठीण

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत रिपब्लिकन पक्षाचे नेते डोनाल्ड ट्रम्प यांचा राष्ट्राध्यक्षपदी पुन्हा एकदा विजय झाला आहे. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या एलॉन मस्क यांनी त्यांना जाहीर पाठिंबा दिला होता. ट्रम्प यांच्या विजयानंतर एलॉन मस्क यांनी आनंद साजरा केला. मात्र, त्यांच्या तृतीयपंथी मुलीला हा विजय रुचलेला नाही. ट्रम्प यांच्या विजयामुळे आता अमेरिकेत माझे भवितव्य दिसत नाही, अशी खंत मस्क यांच्या तृतीयपंथी मुलीने व्यक्त केली आहे. २० वर्षीय व्हिव्हियन जेना विल्सन हिने वडील मस्क यांच्याशी २०२२ साली सर्व संबंध तोडले होते. आपले नाव आणि लिंग बदलण्यासाठी याचिका दाखल केल्यानंतर बाप-लेकाच्या


### ट्रम्प यांच्या मुलीने व्यक्त केली खंत

संबंधात तणाव निर्माण झाला होता.

व्हिव्हियन जेना विल्सनने थ्रेड्स या सोशल मीडिया साईटवर पोस्ट केली आहे. त्यात ती म्हणाली, मी याबाबत बराच विचार केला, पण काल मी निर्णयापर्यंत पोहोचले. मला आता अमेरिकेत माझे भवितव्य दिसत नाही.' अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाचा निकाल लागल्यानंतर व्हिव्हियनने ही पोस्ट केली आहे. आणखी एका पोस्टमध्ये तिने म्हटले, 'त्यांचा (ट्रम्प) कार्यकाळ जरी चार वर्षांचा आहे. या काळात ट्रान्स विरोधी नियम लागू होणार नाहीत, पण या कायद्याच्या विरोधात ज्यांनी मतदान केले, ते तर बदलणार नाहीत.

# केदारनाथमध्ये टाकला जातोय ५० टन कचरा!

**देहरादून :** उत्तराखंड सरकारने एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, या काळात या प्रदेशात प्रक्रिया न केलेल्या कचऱ्यात सातत्याने वाढ झाली आहे. २०२२ मध्ये १३.२० टन, २०२३ मध्ये १८.४८ टन आणि यावर्षी आतापर्यंत १७.५० टन कचरा निर्माण होणार आहे. प्रसिद्ध हिमालयीन मंदिर केदारनाथच्या आजूबाजूच्या खड्ड्यांमध्ये टनांवर प्रक्रिया न केलेला कचरा टाकला जात असल्याने पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील परिसराबद्दल



पर्यावरणवाद्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशातील नोएडास्थित पर्यावरणवादीने माहितीच्या अधिकाराखाली (आरटीआय) मिळवलेल्या माहितीनुसार, केदारनाथमध्ये २०२२ ते २०२४ या कालावधीत एकूण ४९.१८ टन प्रक्रिया न केलेला कचरा मंदिराजवळील दोन खड्ड्यांमध्ये टाकण्यात आला.

# स्वच्छ ऊर्जेचा वापर करणाऱ्यांना पाठिंबा : मुख्यमंत्री डॉ. सावंत

वृत्तसंस्था

**गोवा :** सरकार स्वच्छ ऊर्जेचा वापर करणाऱ्या उद्योगांना पाठिंबा देणार आहे. याद्वारे गोव्याला हरित राज्य करण्याचा आमचा हेतू असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले. पणजीत अमेझींग गोवा समिटच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उद्योग मंत्री मॉविन गुदीन्हो, जलस्त्रोत मंत्री सुभाष शिरोडकर, माजी मंत्री सुरेश प्रभू, विनय वर्मा, राजकुमार कामत, श्रीनिवास धेंपो यांच्यासह ५१ देशातील २०० हून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते.



गोवा केवळ पर्यटन व्यवसायापुरता मर्यादित राहिलेला नाही. येथील नयनरम्य निसर्ग, तयार केलेल्या मूलभूत सोयी सुविधा, महामार्ग, दोन विमानतळ, रेल्वे, बंदर आदींमुळे येथे उद्योग करणे सोयीस्कर आहे. यामुळेच गेल्या काही वर्षात येथे अन्न प्रक्रिया व अन्य हरित उद्योग वाढत आहेत. येथे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा होत आहेत. तसेच गोवा वेडिंग डेस्टिनेशन बनत आहे. येथे परिषद, बैठक, अधिवेशने घेण्याचे प्रमाणदेखील वाढले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.



**पणजी :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांनी नुकतेच समुद्रात भारतीय नौदलाच्या परिचालनाचे निरीक्षण केले. राष्ट्रपती आयएनएस हंसा (गोव्यातील नौदल विमानतळ) येथे उपस्थित होत्या. आयएनएस हंसा येथे नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी आणि पश्चिम नौदल कमांडचे ध्वजाधिकारी कमांडिंग-इन-चीफ वाइस ॲडमिरल संजय जे. सिंह यांनी त्यांचे स्वागत केले.

## दिल्लीत पुन्हा अरविंद केजरीवालांची गरज - मनीष सिसोदिया

**नवी दिल्ली :** पुढील वर्षी दिल्लीत होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी आपली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. आम आदमी पक्षानेही निवडणुकीची तयारी तीव्र केली आहे. दरम्यान, दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री आणि आप नेते मनीष सिसोदिया यांनी भाजप आणि केंद्राला धारेवर धरले आहे. त्यांच्याकडे सीबीआय आणि ईडी आहे, पण आमच्याकडे प्रामाणिक कार्यकर्ते आहेत असे त्यांनी म्हटले आहे. मनीष सिसोदिया म्हणाले, दिल्ली विधानसभा निवडणुका आता जवळ आल्या आहेत. जे समोर आहेत त्यांच्याकडे पैसा, मीडिया, सीबीआय आणि ईडी आहे.

# नेपाळचे पंतप्रधान करणार चीनचा दौरा!

## ६४ वर्षांची परंपरा खंडित होणार

वृत्तसंस्था

**काठमांडू :** चीनचे गुलाम म्हणवले जाणारे नेपाळचे नवे पंतप्रधान के. पी. ओली आपल्या पहिल्या अधिकृत परदेश दौऱ्यावर चीनला जात आहेत. नेपाळच्या परराष्ट्र मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार के. पी. ओली डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात चीनमध्ये जाणार आहेत. यापूर्वी नेपाळमध्ये अशी परंपरा होती की जो कोणी नवा पंतप्रधान बनतो तो प्रथम भारताला भेट देतो. मात्र, ओली यांनी पंतप्रधान झाल्यानंतर अनेक भारतविरोधी पावले उचलली होती.

नेपाळचा वादग्रस्त नकाशा, अयोध्या प्रकरण यासंबंधीच्या ओली यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे दोन्ही देशांतील संबंध रसातळाला गेले होते. आता केपी ओली पुन्हा पंतप्रधानपदी परतले असताना भारताने त्यांना महत्त्व दिलेले नाही. भारतातील नरेंद्र मोदी सरकारने के. पी. ओली यांना अधिकृत निमंत्रणही दिलेले नाही. त्यामुळे त्यांनी भारताकडे दुर्लक्ष करत चीनला भेट देण्याची तयारी दर्शवल्यामुळे ६४ वर्षांची परंपरा खंडित होणार आहे. के. पी. ओली यांनी पदभार स्वीकारून ४ महिने झाले असले तरी भारताने शांतता पाळली आहे. भारताच्या थंड वृत्तीचे कारण नवी दिल्लीच्या धोरणांमध्ये झालेला बदल आहे, असे मानले जाते.

# लाचखोर अधिकाऱ्याला लाच घेताना पकडले

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** केंद्रीय अन्वेषण ब्युरोने दिल्ली अर्बन शेल्टर इम्प्रूव्हमेंट बोर्ड कायदा अधिकारी विजय मग्गु याला ५ लाख रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. यानंतर तपास पुढे नेत असताना सीबीआयने विजय मग्गु यांच्या घरावर छापा टाकला तेव्हा मोठा धक्का बसला. सीबीआयने विजयच्या घरातून ३.७९ कोटी

### घरात सापडले कोट्यवधींचे घबाड

रुपयांची रोकड जप्त केली. रोकड मोठ्या प्रमाणात सापडली. विजय मग्गु यांच्या व्यतिरिक्त सीबीआयने आणखी दोन जणांना ताब्यात घेतले आहे.

सीबीआयने ही कारवाई विजय मग्गु यांच्यावर ५ लाख रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करणाऱ्या व्यक्तीच्या तक्रारीवरून केली.

## लालकृष्ण अडवाणींचे ९८ व्या वर्षात पदार्पण

**पुणे :** देशाचे माजी उपपंतप्रधान आणि भाजपचे दिग्गज नेते लालकृष्ण अडवाणी यांनी शुक्रवारी वयाच्या ९८ व्या वर्षात पदार्पण केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी अडवाणी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे अभीष्टचिंतन केले. पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडियावरूनही अडवाणी यांच्याविषयी भावना व्यक्त केल्या.

# कॅन्सरचे प्रतिवर्षी ९०० हून अधिक बळी

वृत्तसंस्था

**बेंगळूर :** राज्यात प्रतिवर्षी ९०० हून अधिक मुले कॅन्सरचे बळी पडत असल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. राज्यात वर्षभरात ९७५ मुलांमध्ये कॅन्सर दिसून आल्याचे किडवाई स्मारक ग्रंथी संस्थेने म्हटले आहे. यापैकी एका बेंगळुरू शहरात २८० ते ३०० मुले कॅन्सरग्रस्त दिसून येत आहेत. सर्व वयोगटातील व्यक्तींचा विचार केल्यास २.७ टक्के मुले व १.३ टक्के पुरुषात कॅन्सर दिसून येतो.

राज्यात मागीलवर्षी कॅन्सरची सुमारे ८६,५६३ नवी प्रकरणे दाखल झाली होती. २.३ लाख प्रकरणांवर चिकित्सा करण्यात आली आहे. एका बेंगळुरू शहरामध्ये गतवर्षी १४,६३० कॅन्सरची प्रकरणे दाखल झाली असून यामध्ये ६,६५० पुरुष व ७९८० महिला कॅन्सर रुग्ण दिसून आले आहेत.

### वर्षभरात २२ हजार नवी प्रकरणे दाखल

राज्यातील कॅन्सरचे प्रसिद्ध उपचार केंद्र म्हणून किडवाई स्मारक ग्रंथी रुग्णालयाचा उल्लेख करता येईल. या रुग्णालयात राष्ट्रीय कॅन्सर दिन प्रतिवर्षी ७ नोव्हेंबरला साजरा करण्यात येत असतो. या दिनाच्या निमित्ताने मुलांच्या कॅन्सरवर कार्यशाळा होत असते. या रुग्णालयात वर्षभरात सुमारे २२ हजार नवी प्रकरणे दाखल होत असतात.

कॅन्सरमध्ये विविध प्रकार आहेत. लिम्फाफाईड ल्युकेमिया (२०.६ टक्के), मायलॉईड ल्युकेमिया (१४.४ टक्के), मेंदू व मज्जातंतू कॅन्सर (१३.८ टक्के), एनएचएल (६.५ टक्के), महिलांमध्ये लिम्फाईड ल्युकेमिया (२५.५ टक्के), मेंदू व मज्जातंतूचा कॅन्सर (१२.८ टक्के), मायलॉईड ल्युकेमिया (१२.८

### बेंगळुरू शहरात २८० ते ३०० मुले कॅन्सरग्रस्त



टक्के), सांध्यासंबंधीचा कॅन्सर (१.१७ टक्के), अंडाशयाचा कॅन्सर (५.३ टक्के), हॅडल्कीन्स कॅन्सर (४.३ टक्के) आढळून आलेला आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

# शरीराचे विसर्जन हा अधिकार!

## कनकेश्वरी देवीजी — भजनाने परिसर झाला भक्तीमय

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भगवान शंकराची पूजा व भक्ती कधीही करता येते यासाठी कुठल्याही वेळेचे बंधन नसून शिव हे ज्ञान व वैराग्याचे रूप आहे मनुष्याच्या शरीराचे विसर्जन हा अधिकार असून त्याचा आनंद घेणे हा हक्क आहे माणसाचे शरीर हेच एक शिवलिंग असल्याचे प्रतिपादन माता कनकेश्वरी देवीजी यांनी परळी येथे केले.

पंचम ज्योतिर्लिंग परळी येथील हालगे गार्डन येथे बुधवार दि.६ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत दररोज दुपारी ३ ते ६ या वेळेत सुरू असलेल्या शिवमहापुराण कथा ज्ञान यज्ञात रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी माता कनकेश्वरी देवीजी कथेचे पाचवे पुष्प गुंफताना भगवान शंकराची भक्ती कशी करावी यावर सविस्तर विमोचन केले. अन्य देवांच्या मुर्तींची स्थापना करण्यासाठी प्राणप्रतिष्ठा मंत्रांची गरज असते तर शिवलिंग स्थापित करण्यासाठी फक्त ओमकार उच्चारण करत शिवलिंग स्थापित करता येते.ज्या गावात शिवलिंग नाही तेथे स्मशानाला शिवलिंग मानावे. कारण शिव ज्ञान, वैराग्य स्वरूप आहे असे सांगून शिवलिंगाचे अनेक प्रकार सांगितले.यातील सर्वात महत्त्वाचे शिवलिंग हे गुरुलिंग आहे जे गुरु द्वारा स्थापित होते.गुरुलिंगात चरलिंग,रसलिंग,स्थापित लिंग आहे.



जेवढे दगड आहेत त्यात शिवाचा वास असल्याने जितने कंकर उतने शंकर असे भगवान शंकराला संबोधले जाते.शिवलिंगामध्ये वास्तुदोष दूर करण्यासाठी नर्मदेश्वरांची भक्ती आवश्यक आहे.शिवालयात कधीही पुजा केली जाऊ शकते.स्पटीक शिवलिंगाची पुजा मात्र महिलांसाठी विशेष आहे. परिवारातील सर्वांसाठी,पतीच्या आयुष्यासाठी,आयुष्याच्या सुखासाठी ही पुजा करावी.प्रथम पार्थिव लिंगाची पुजा आवश्यक आहे.माता,पिता,गाय,प्राण्यांच्या पुजेनंतरच शिवपुजा मान्य आहे.परमार्थ पार्थिव पुजा आहे.माती,भस्म,गोमूत्र यापासून बनवलेल्या शिवलिंगाची पूजा करता येते.आपले मन,शरीर हे देखील शिवलिंगच आहे कारण शरीर हे पंचतत्वापासुन बनलेले आहे.शरीराचे विसर्जन हा अधिकार आहे.त्याचा आनंद घेणे हा देखील हक्क आहे.यासाठीच पार्थिव पुजा मदतगार असल्याचे सांगितले.

# बीडमध्ये एमआयएम पक्षाला खिंडार

## पक्षांतर: वंचितमध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा जाहिर प्रवेश




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

ऐन निवडणूकीच्या काळात बीडमधील एमआयएम पक्षाला चांगलाच धक्का बसला आहे. पक्षाचे जिल्हा सचिव अन्वर पाशा यांच्यासह शेकडो कार्यकत्यांनी वंचित बहुजन आघाडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर येथील पक्ष कार्यालयात जाहिर प्रवेश केला.

याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ता तय्यब जफर,बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार पुरुषोत्तम वीर,वंचितचे नेते डॉ.नितीन सोनवणे,बीड जिल्हा संघटक डॉ.गणेश खेमाडे,तालुका उपाध्यक्ष श्रीकांत वाघमारे,शहर महासचिव संदीप जाधव,छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष योगेश बन,महासचिव पंकज बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रवेशावेळी अन्वर पाशा म्हणाले,राजकारण हे फक्त एखाद्या विशिष्ट जातीपुरते न करता,संपूर्ण समाज व मानवाचा विकास साधने महत्वाचे असते. असा विकास व जातीपातीच्या पलिकडचे सर्वसमावेशक राजकारण फक्त पान २ वर...

# मौलाना अबुल कलाम आझाद जयंती

## अरफात खान : जयंती साजरी करण्याचे आवाहन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांची दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी जयंती आहे. ही जयंती सर्व शासकीय-प्रशासकीय कार्यालयात हर्षोल्लासात साजरी करण्यात यावी असे आवाहन मौलाना आझाद युवा मंचचे बीड जिल्हाध्यक्ष अरफात खान यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे की, सध्या शाळांना दीपावलीच्या सुट्ट्या आहेत. यामुळे शाळेत विद्यार्थी आणि शिक्षकांची अनुपस्थिती आहे. शाळा सुरू असल्या तर प्रत्येक शाळेत प्रत्येक महापुरुषांची जयंती-पुण्यतिथी साजरी करण्यात येतेच येते. सध्या मात्र शाळांना दिवाळीच्या सुट्ट्या असल्याने मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती शाळांमध्ये साजरी होणार नाही. मात्र जयंतीदिनी म्हणजेच सोमवार दिनांक ११ नोव्हेंबर २०२४ रोजी शासकीय-प्रशासकीय कार्यालयांना सुट्टी नसल्याने सर्व कार्यालय नियत वेळेनुसार सुरू राहतील. तेव्हा बीड जिल्ह्यातील सर्व शासकीय-प्रशासकीय कार्यालयात आपल्या भारत देशाच्या स्वतंत्रतेनंतर प्रथम शिक्षण मंत्री झालेले मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती हर्षोल्लासात साजरी करावी जेणेकरून आपल्या देशाच्या पान २ वर...

# खर्च लेखे सादर करण्याबाबत नोटिसा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या खर्चाच्या लेख्यांची पहिली तपासणी शुक्रवारी (ता.८) खर्च निरीक्षक यांच्या उपस्थितीत आष्टीच्या उपकोषागार कार्यालयातील खर्च संनियंत्रण कक्षात झाली. त्यानुसार उमेदवार महेबुब इब्राहिम शेख, प्रदीप चव्हाण यांना निवडणूक खर्चाचा हिशोब विलंबाच्या कारणांसह, तर सुरेश धस, बाळासाहेब आजबे, भिमराव धोंडे यांना लेख्यातील तफावत संदर्भात ४८ तासात खुलासा सादर करावा, अशा नोटिसा लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ नुसार बजावल्याचे आष्टीच्या निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी कळविले आहे.

# सिंदफणा शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव

## प्राचार्य सागर राऊत :खेळातून संस्कार आणि विकास होतो

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

विद्या भुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलमध्ये शाळेचा सचिव मंगलताई सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि. ८ नोव्हेंबर) इयत्ता पहिली दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. गुरुकुल इंग्लिश स्कूल, बीड चे आयोजन श्री. शितल सर्वज्ञ आणि एम.आय.टी. स्कूल, अंबाजोगाई चे प्राचार्य श्री. सागर राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.




क्रीडा महोत्सवाची सुरुवात भव्य ध्वजारोहणाने करण्यात आली. यानंतर इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी फैझाह शेख हिने सर्व खेळाडूंच्या वतीने क्रीडा शपथ दिली. या प्रसंगी क्रीडा शिक्षक श्री. पुरुषोत्तम सर यांनी मनोगत व्यक्त करताना खेळांचे महत्त्व विशद केले. प्रमुख पाहुणे एम.आय.टी. स्कूल, अंबाजोगाई चे प्राचार्य श्री. सागर राऊत यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील संधी आणि महत्त्व पटवून देताना खेळातून संस्कार, निर्णय क्षमता, सहानुभूती, शिस्त आणि सहकार्याची भावना खेळातूनच निर्माण होते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या गुणांच्या बळावर व्यक्ती कोणतेही कार्य करण्यास सक्षम होतो असे प्रतिपादन केले.शाळेचे प्राचार्य श्री. अन्वर शेख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात शाळेच्या क्रीडा विभागाने गेल्या वर्षभरात गाठलेल्या यशस्वी टप्प्यांचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी पुढील शैक्षणिक वर्षापासून रायफल शूटिंग हा नवीन खेळ शाळेत सुरू करण्याची घोषणा केली, जी उपस्थितांकडून टाळ्यांच्या गजरात स्वीकारण्यात आली.या क्रीडा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा संचालक दीपक माने, क्रीडा शिक्षक पुरुषोत्तम सोळंके, वैशाली सोळंके, सचिन मंजुळे, शैक्षणिक विभाग प्रमुख धनंजय सोमवंशी, पान २ वर...

# हाफ मॅराथॉन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

## क्रीडा: श्री पार्डिकर महाविद्यालयाचे यश

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

योगा प्रतिष्ठान, चंमपावती क्रीडा मंडळ आणि मौजकर ग्रुप बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बालाघाट हाफ मॅराथॉनचे आयोजन आज दि. १० नोव्हेंबर २०२४ रविवार रोजी करण्यात आले होते. या मॅराथॉन स्पर्धा २१ कि.मी. आणि १० की. मि.आशा दोन प्रकारात घेण्यात आल्या.२१ कि.मी. मॅराथॉन स्पर्धेत कू. आश्विन जाधव (बी एस सी तृतीय वर्ष) आणि १० कि.मी. मॅराथॉन स्पर्धेत कू. निकिता म्हात्रे (बी ए तृतीय वर्ष) श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालय सिरसाळा च्या या दोन्ही मुलींनी अनुक्रमे प्रथम क्रमांक पटकावला.




यांना योगा प्रतिष्ठान, चंमपावती क्रीडा मंडळ आणि मौजकर ग्रुप बीड यांच्या तर्फे अनुक्रमे ११००० रूपये व ७००० रूपये रोख आणि सायकल बक्षीस म्हणून देण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थाध्यक्ष पान २ वर...

# श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा

## अध्यात्मिक: ४५० वर्षाची अखंडित परंपरा कायम

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री मन्मथ स्वामी महाराज यांची संजीवन समाधी असलेल्या श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्हा हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संत महादेव बाबा, संत भगवान बाबा, संत वामन भाऊ, संत ज्ञानेश्वर माऊली यासारखे अनेक संत जिल्ह्यात होऊन गेले. अनेक वर्षाचा कालखंडामध्ये त्यांनी कीर्ती केली.

महाराष्ट्रामध्ये दोनच संत असे होऊन गेले की, त्यांनी संजीवन समाधी घेतली. 'संत ज्ञानेश्वर' आणि 'संत मन्मथ स्वामी' मन्मथ स्वामी यांची गेल्या ४५० वर्षां पासून कार्तिक पौर्णिमेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. लिंगायत समाजाचे श्रद्धास्थान म्हणून 'श्रीक्षेत्र कपिलधार' महाराष्ट्रात नव्हे तर देशामध्ये ओळखले जाते.श्री क्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त अखंड शिवनाम



सप्ताहाचे प्रारंभ दिनांक ९-११-२०२४ रोजी करण्यात आला असून या सप्ताहामध्ये संपूर्ण महाराष्ट्र भरातून गायक, वादक तसेच शिवकिर्तनकाराचे व भाविक भक्तांची उपस्थिती असते यामध्ये भजन, शिवकिर्तन, शिवपाठ, काकडा, भारुड, श्रीची महापूजा अन्नदान व शेज आरती तसेच धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे व महा प्रसादाचे आयोजन करण्यात येते. येणार्या १५ नोव्हेंबर ला त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध राज्यातून पायी दिंडीयांचे आगमन होते . तसेच अनेक राज्यातून शेकडो पान २ वर...

# साहित्य परिषदेच्या निवडणुकीत विजय

## अभिनंदनिय: डॉ.दिपाताई क्षीरसागर झाल्या विजयी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्य क्षेत्रात मराठवाड्यात मागील साधारणतः सात-आठ दशकांपासून कार्यरत असणाऱ्या नामांकित अशा मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत प्राचार्य डॉ.दिपाताई भारतभूषण क्षीरसागर मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या. त्यांच्या या विजयाबद्दल साहित्य, संस्कृती आणि लेखन - संशोधनाच्या क्षेत्रात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून सर्वस्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



प्राचार्य डॉ.दिपाताई क्षीरसागर या सुप्रसिद्ध दिवंगत कवयित्री सुहासिनी इर्लेकर यांच्या कन्या असून मराठी साहित्यातील एक आघाडीच्या लेखिका म्हणून त्या सुपरिचित आहेत. लेखन, संशोधन, संपादनासाठी त्यांनी दिलेले योगदान साहित्याच्या पान २ वर...

## पडघम — बालाघाट अनिलदादांच्या पाठीशी!

# बीड क्षीरसागरांपासून मुक्त करु

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

तळागाळातील माणसांची जाण असणारे सर्वसामान्यांचे नेतृत्व मा. अनिलदादा जगताप यांच्या प्रचार दौऱ्यास मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळत असून ग्रामीण भागातील मतदार औंदा दादा तुम्हीच आमदार आशा प्रतिक्रिया व्यक्त करत विजयासाठी शुभेच्छा देत आहेत. विशेष म्हणजे गावागावतील माता-माऊल्यांनी औक्षण काढून दादा तुझ्या पाठीशी आम्ही आहोत, तू काळजीच करू नको म्हणून विजयासाठी आशीर्वाद देखील दिले.

काल दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी बालाघाटावरील चांदणी, तांदळवाडी घाट, साखरे बोरगाव,



उदंड वडगाव, चौदासवाडी, सफेपूर, रत्नागिरी, गवारी, मांजरसूंबा, सासेवाडी, खंडाळा, कोळवाडी या गावात निमित्त प्रचार गावाकऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या तर माजी मंत्री प्रा सुरेश नवले यांच्या उपस्थितीत कॉर्नर बैठका देखील घेतल्या. बालाघाटावरील गावागावात मतदारांनी अनिलदादा यांचे आगमन होताच जोरदार स्वागत करत हृदय सत्कार केला. आजवर आम्ही अनेकांना संधी दिली. मात्र प्रत्येकाने आमचा विश्वासघातच केला. आम्ही भूल थापांना बळी पडलोत. पण आता दादा तुम्ही सर्वसामान्यांचा आवाज आहात त्यामुळे औंदा आम्ही पूर्ण ताकदीने आमदार करणार असल्याची भावना बालाघाटावरील

# महिलांचे हित जोपासले जाईल!

## पडघम:ऐश्वर्या सोळंके यांचा प्रचाराचा झुंझावात



दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रचारासाठी त्यांच्या सुनबाई ऐश्वर्या जयसिंह सोळंके यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील गावोगावी महिला भगिनींची भेट घेत प्रचाराचा झुंजवात सुरू केला आहे. गेल्या काही वर्षात आरोग्य सेवेच्या विविध उपक्रमामुळे ऐश्वर्या सोळंके यांची मतदार संघात विशेष क्रेझ आहे.

शुक्रवारी धारूर तालुक्यातील जैतापूर, देवठाणा, नागझरी तांडा, सजगणी तांडा व शेरी तांडा येथील महिला मतदारांची भेट घेत महायुतीच्या सरकारमध्ये लाडक्या बहिणींना सरकारने सुरू केलेल्या योजनेबाबत माहिती देत भविष्यात महायुतीचे सरकार महिलांचे हिताचे सरकार असल्याचे विधान केले. आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी माजलगाव विधानसभा मतदारसंघात चार टर्म आमदारकी असताना विविध जाती-धर्मातील पान २ वर...